क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन

लेखक:
निमिष सोनार

क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन

निमिष सोनार

ई साहित्य प्रतिष्ठान

क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन (कादंबरी)

लेखक: निमिष सोनार

फ्लॅट नं- 507, "साई ब्लॉसम",
सर्व्हे नं- 17/1A, तुषार पार्क,
माधव नगर, (गुडविल स्क्वेअर बिल्डिंगजवळ)
धानोरी, पुणे- 411015

फ़ोन नंबर: 9763793199

ब्लॉग: http://nimishkrut.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान
ईलेवन्थ फ़्लोअर, ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत
400604
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन: २५ नोव्हेंबर २०२५

© esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २००/- फक्त संपर्क- निमिष सोनार 9763793199
(१००% रक्कम लेखकांकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)

लेखकाचे मनोगत

मी व्यवसायाने आयटी आणि टेलिकॉम क्षेत्रात विविध खासगी कंपनीत गेली 22 वर्षे कार्यरत आहे. तथापि, वाचन आणि लेखन हा माझा शालेय जीवनापासून छंद आहे. माझ्या घरात वाचन किंवा लेखनाची परंपरा किंवा साहित्यिक परंपरा नाही. माझी ती आवड हळूहळू आणि आपोआप निर्माण झाली, त्याचे कारण म्हणजे मूळचे माझे संवेदनशील आणि सौंदर्यदृष्टी असलेले रसिक मन.

लेखक हा संवेदनशील असला पाहिजे, तेव्हाच तो स्वतःसोबत इतरांच्या भावनाही तितक्याच ताकदीने शब्दांत मांडू शकतो. तसेच लेखक हा, कुणाच्या (व्यक्ती, पक्ष किंवा संघटनेच्या) दबावाखाली येऊन त्यांना सोयीस्कर असे लिहिणारा नसावा आणि त्यांच्या दबावाखाली येऊन लिहिलेले बदलणारा सुद्धा नसावा!

पुढे माझे मामा श्री. प्रशांत बाळापुरे यांच्यामुळे मला ही सर्व साहित्य जगताची गोडी वाढली. त्यांच्याकडून वाचनप्रेरणा मिळाली. त्यांच्या घरी असलेल्या वैयक्तिक लायब्ररीतून अनेक पुस्तकांची ओळख झाली. मग मी विविध वर्तमानपत्रात लिहायला लागलो. माझाही पुस्तक संग्रह वाढत गेला. हळूहळू कादंबरी आणि कथालेखनाची आवड निर्माण झाली. ललित लेखन सुद्धा मी बरेच केले आहे. विविध दिवाळी अंकात माझ्या कथा आणि लेख

छापून येत असतात. काही ठराविक दिवाळी अंक दरवर्षी मी नियमित विकत घेऊन वाचतो. लेखन आणि वाचनाखालोखाल मी व्यंगचित्रे आणि स्केचिंग करतो.

ई साहित्य, ॲमेझॉन, मायबोली, वॅटपॅड, प्रतिलिपी आणि इतर विविध प्लॅटफॉर्मवर माझ्या आतापर्यंत ५० कथा, दोन कथासंग्रह आणि जलजीवा, वलय, डिटेक्टिव्ह निगेटिव्ह, क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन, ये ना साजणा या मराठी कादंबऱ्या आणि फ्लिटिंग लवर्स ही इंग्रजी कादंबरी प्रकाशित झाले आहेत. तसेच महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब तर्फे आणि मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते ऑगस्ट २०२५ मध्ये प्रकाशित झालेले "आमच्या ट्रिपची गोष्ट" या पुस्तकातसुद्धा माझे "सातारा आणि सज्जनगड" याचे प्रवासवर्णन छापून आलेले आहे. महाराष्ट्र टाईम्स तर्फे या पुस्तकात लिहिण्यासाठी मला आमंत्रण देण्यात आले होते. मी "अर्थ मराठी" प्रकाशनाच्या अभिषेक ठमके यांनी संस्थापित केलेल्या "आरंभ" या मासिकाचा एक वर्ष संपादक होतो. मला धार्मिक, विज्ञान, प्रेमकथा, फॅन्टसी, ऐतिहासिक, काल्पनिक, हॉरर, विनोदी आणि प्रवासवर्णन हे प्रकार वाचायला आणि लिहायला आवडतात. आताशा मी प्रेम या विषयावर चारोळी लिहित असतो. त्यासाठी मी एआयची मदत घेतो. तसेच व्यंगचित्रे काढण्यासाठी सुद्धा. मी मराठी आणि इंग्रजी साहित्य नियमित वाचतो. माझे आवडीचे लेखक आहेत, व. पु. काळे, सुहास शिरवळकर, नारायण धारप, रत्नाकर मतकरी, मुकुंद टाकसाळे, सौरभ वागळे, मेधा इनामदार, मीना प्रभु, गो. नि. दांडेकर, वि. स. वाळिंबे, रणजीत देसाई, इंद्रायणी सावकार, डॉ. अंजली जोशी, सिडनी शेल्डन, शोभा डे, डॅनियल हर्स्ट, डॅन ब्राऊन, जे. के. रोलिंग, आयर्विंग वॅलेस, सुदीप नगरकर, चेतन भगत इत्यादी.

ई साहित्यने अनेक नवोदित लेखक मंडळींना उजेडात आणले आहेत हे निर्विवाद सत्य आहे आणि त्यांच्यातर्फे आतापर्यंत माझ्या अनेक कादंबऱ्या प्रकाशित केल्या आहेत, याबद्दल त्यांचे मनापासून आभार. या वर्षी ''बुद्धिबळातील साप'' नंतर ई साहित्यतर्फे माझी "क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन" ही नवीन कादंबरी प्रकाशित होताना मला मनापासून आनंद होत आहे. प्राचीन काळातील आणि परदेशी पात्रे असलेली फॅंटसी कादंबरी लिहिण्याचे अनेक दिवस मनात होते. शेवटी त्याला मूर्त रूप मिळाले आणि त्यातूनच ही कादंबरी वाचकाच्या सेवेला हजर आहे. ही कोणत्याही इंग्रजी कादंबरीचा अनुवाद नसून माझ्या कल्पनेतून साकारलेली स्वतंत्र आणि ओरिजिनल कथा आहे. या काल्पनिक कादंबरीचा वास्तवाशी आणि कोणत्याही देशाच्या इतिहासाशी कोणताही संबंध नाही. चला तर, तेव्हा वेळ न दडवता वाचनाचा आनंद घ्या आणि आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

धन्यवाद.

आपलाच लेखक,

निमिष सोनार, पुणे

निमिष सोनार यांचे ई साहित्य:

कादंबऱ्या: (मराठी) जलजीवा, वलय, डिटेक्टिव्ह निगेटिव्ह, बुद्धिबळातील साप, क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन, ये ना साजणा

(इंग्रजी) फ्लिर्टिंग लवर्स

कथा: 50 च्या वर

कथासंग्रह: अज्ञात वाटा, रंजक बोधकथा

अनेक वर्तमानपत्रे आणि दिवाळी अंकात लिखाण

ओंकार बागल यांची प्रस्तावना:

जादू म्हणजे नेमकं असते तरी काय? एखादा विदूषक, जादूगार हे लोकांना ज्या जादू दाखवतात, त्यात बऱ्याच अंशी विज्ञान किंवा हाताची सफाई, हात चलाखी अशा गोष्टींचा समावेश असतो. बाकी जेव्हा आपल्या मनोबुद्धीला न पटणाऱ्या, आकलनक्षमतेच्या बाहेर असणाऱ्या गोष्टी आपल्याला चमत्कारिक वाटतात. अशा गोष्टी ज्या मानवाच्या लेखी अतार्किक आणि अवैज्ञानिक असू शकतात. मात्र, वर्षानुवर्षांपासून घडलेल्या कितीतरी चमत्कारिक गोष्टी ऐकत असतो, वाचत असतो. कदाचित त्या त्या काळातील लोकांनी त्या पाहिल्या देखील असतील.

मग हे जादुई जग असतं तरी काय? ह्या चमत्कारिक वाटणाऱ्या गोष्टी खरंच अस्तित्वात असतात का? आपण ज्या विविध जादूंनी भरलेल्या गोष्टी ऐकतो वाचतो, त्यात काय तथ्य असावे बरे? शिवाय ह्या गोष्टी प्रचलित झाल्या त्यामागे काय कारण असावे? अशा नानाविध प्रश्नांनी कोणीही साधारण मनुष्य नक्कीच भांबावून जाऊ शकतो. याबाबत मला तरी असे वाटते की अनेक कालावधींत घडून गेलेल्या गोष्टी, प्रसंग अथवा घटना ह्या त्या त्या ठराविक काळात घडलेल्या असतात. त्या कालावधीपासून ते आजच्या वर्तमानापर्यंत कितीतरी काळ लोटला आहे.

शिवाय तेव्हा ज्या गोष्टी अस्तित्वात होत्या, त्या आजच्या घडीला अस्तित्वात नाहीत. परंतू साऱ्या गोष्टी अनादी काळापर्यंत अस्तित्वात राहतीलच, असे गरजेचेदेखील नाही ना! त्यामुळे ज्याला आपण आजच्या घडीला जादू किंवा चमत्कार म्हणतो तो त्या काळात एखादी सामान्य गोष्ट असू शकते. ह्या गोष्टीला पुरावा नाही किंवा वैज्ञानिक आधार नाही, म्हणून केवळ आपण ह्याला तत्वतः मान्य करत नाही तो भाग वेगळा. असो! ह्या

खऱ्या गोष्टी असोत किंवा काल्पनिक मात्र यांतील रंजकता मात्र अतिशय आगळीवेगळी असते.

याच अनुषंगाने लेखक निमिष सोनार यांनी 'क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन' ही कादंबरी लिहिली आहे. प्राचीन जादुई दुनिया कशी असेल? त्यात आणखी काय गंमती- जंमती असतील? ह्या जादूंचा, चमत्कारांचा एकमेकांवर काय परिणाम होत असेल? त्यामुळे आजुबाजूच्या परिस्थिती कशा बदलत असतील? त्याचा जनजीवनावर कशाप्रकारे परिणाम घडत असेल? ह्या साऱ्या गोष्टी ओघाने आल्याच. ह्या कादंबरीच्या निमित्ताने लेखकांनी आपल्या वाचकांना एका अनोख्या प्राचीन जादुई जगाची सफर घडवून आणली आहे, हे मात्र नक्की.

जादुई गोष्टींनी भरलेल्या, रहस्यमयी प्रसंगांनी परिपूर्ण आणि एका अत्युच्च काल्पनिक सफरींनी वेढलेली ही कादंबरी म्हणजे परीकथांची आवड असणाऱ्यांसाठी तर उत्तम मेजवानीच असल्यासारखी आहे. ह्या कादंबरीत जादू, चमत्कार अशा गोष्टी केंद्रबिंदू असल्या तरी त्यांमध्ये रहस्यमयी प्रसंग आणि चित्तथरारक घटनादेखील वाचायला मिळतात. मुळात परीकथांचे नेहमी हेच प्रमुख आकर्षण राहिले आहे. मात्र, 'क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन' ही कादंबरी आणखी बऱ्याच अंगांनी वेगळी आहे. अगोदर नमूद केलेल्या सर्व गोष्टी ह्या कादंबरीत आहेतच शिवाय ठोस लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे कादंबरीतील पात्र क्लिओपात्रा.

लेखकाने ज्या दृष्टिकोनातून क्लिओपात्राला आपल्या लेखणीतून साकारले आहे, ते एक वेगळे वैशिष्ट्य आहे. शिवाय पाश्चिमात्य जगात जिथे अशी पात्रे अधिक प्रमाणात प्रसिद्ध आहेत मात्र पूर्व भागातील जगतात, हे जादुई विश्व अतिशय तुरळक प्रमाणात जनसामान्यांत पोहोचले आहे. त्यामुळे आपल्या देशातील आणि प्रामुख्याने मराठी वाचकांसाठी क्लिओपात्राची ही कहाणी नक्कीच आवडेल.

कादंबरीतील वेधून घेणारा महत्वाचा मुद्दा म्हणजे प्रवृत्ती. चांगल्या आणि वाईट प्रवृत्तींमधील द्वंद. यानिमित्ताने लेखकांनी प्रवृत्तींमधील फरक अधोरेखित करत अंततः विजय हा चांगूपणाचाच होतो, हेदेखील सूचित केले. हे द्वंद शतकानुशतके चालू आहे आणि ते कदाचित काळाच्या अंतापर्यंत चालूच असेल! कादंबरीतून साहस, धाडस आणि जिद्द हे गुण प्रकर्षाने पुढे येतात आणि बऱ्याच अंशी प्रेरणा देऊन जातात. 'मनुष्याला होणारे भास' ह्या मानसिक अनुभवांना कादंबरीतून वेगळ्या पद्धतीने दर्शविले आहे. हे भास रोजच्या जगण्यातदेखील आपल्यावर कसे परिणाम करतात, याचा वाचताना अंदाज येतो. परीकथेच्याआधारे खरं तर लेखकांनी स्त्रीवादी लिखाणाचं वाचकांसाठी सादर केले आहे, असं म्हणायला हरकत नाही.

क्लिओपात्रा आणि तिची आईचे पात्र, ब्लड स्टोनच्या बाबतीत ज्याप्रकारे साकारले गेले आहे किंवा राज्याचे प्रमुख म्हणून स्त्रियांना ज्यायोगे सक्षम दाखवले आहे. ते खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचे एक सुंदर उदाहरण आहे. याखेरीज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने घर, समाज आणि राज्य चालवू शकतात हा विचार बाजूला सारून, स्त्री आणि पुरुष दोघेही एकत्रितरीत्या घर, समाज आणि राज्य घडवू शकतात, हा स्त्री-पुरुष समानतेचा अर्थ यथोचित मांडला आहे. राष्ट्र उन्नतीसाठी शेती किती महत्त्वाची आहे, त्यातील आधुनिकता किंवा काळाची आणि परिस्थितीची गरज ओळखून विकसित केलेले विज्ञान किती महत्वाचे आहे, हेदेखील कादंबरीतून लक्षात घेण्यासारखे आहे.

मनात कोरून बसलेला एक मुद्दा म्हणजे असा की आपण जेव्हा एखाद्या चांगल्या कामासाठी बाहेर पडतो अथवा ते काम हाती घेतो तेव्हा आपल्यासोबत घडणाऱ्या गोष्टी. आपल्याला भेटलेल्या चांगल्या-वाईट व्यक्ती, अनुभव आणि प्रसंग. त्यामुळे ह्या कादंबरीद्वारे तरुणाईला जगण्यातला एक वेगळा दृष्टिकोन नक्कीच मिळेल. आपण कितीही धडपड करोत, वाईट

प्रवृत्ती कितीही त्यांच्या परिसीमा गाठोत. तरीही, शेवटी एक परमोच्च शक्ती नेहमीच अस्तित्वात असते जी अशा प्रवृत्तींना नेहमीच मात देत आली आहे आणि देत राहील. असा समाधानी आशावाद वाचकाला सुखावत जाईल.

जादू हा मुद्दा लेखकाने ज्या पद्धतीने मांडला आहे तो वाखाणण्यासारखा आहे. जादू, चमत्कार अशा गोष्टींना आपण कोणत्या आणि कशा दृष्टिकोनातून पाहायला हवे आणि आपल्या स्वतःमध्ये कशाप्रकारे अंगीकारला पाहिजे, ह्याबद्दल अतिशय चोख मत उत्तमरीत्या व्यक्त केले आहे. जादूच्या संकल्पनेला एका अंगाने पंचमहाभूतांच्या तत्वांची जोड देऊन एक वेगळ्याच धाटणीचं लिखाण आणि प्रसंग या कादंबरीत चितारले आहेत. जादू ही ना शस्त्र आहे, ना सत्ता मिळवण्याचं साधन. जादू म्हणजे विश्वातील शक्तींचा प्रवाह आहे. प्रकाश, पाणी, अग्नी, आणि हवेचा संतुलित संगम, ह्याची जाणीव होते.

सरतेशेवटी लेखक म्हणतात, "जादू ही तुमच्या मनाचा आरसा आहे. जर तुमचं अंतःकरण स्वार्थ, राग, किंवा सूडबुद्धीने भरलेलं असेल, तर जादू त्या भावनांना वाढवेल आणि अंधार निर्माण करेल. पण जर तुमचं अंतःकरण प्रेम, करुणा, आणि रक्षणाच्या भावनेने भरलेलं असेल, तर जादू प्रकाशाचा स्रोत बनेल." अशाप्रकारे, लेखक निमिष सोनार यांनी 'क्लिओपात्रा आणि ब्लड स्टोन' ह्या कादंबरीच्या माध्यमातून एक सुंदर आणि भारावून टाकणारा अनुभव वाचकांसमोर मांडला असून ती वाचकांना नक्कीच एक रोमहर्षक जगतात घेऊन जाणारी आहे, याची खात्री आहे.

- © ओंकार दिलीप बागल
9321409890
bookbandhureviews@gmail.com
Insta ID: bookbandhu_reviews

अर्पणपत्रिका

जादूची अद्भुत दुनिया आवडणाऱ्या लहान थोर सर्वांना समर्पित

प्रकरण 1

प्राचीन काळात रात्रीच्या गडद पडद्याखाली, मेडिटेरनियन समुद्राच्या रोमग्रीप्टस बेटावर वसलेल्या नगरीत, राजवाड्याच्या उंच मनोऱ्यांमधून चंद्रप्रकाश खिडकीतून आत येत होता. राजकुमारी क्लिओपात्रा, तिच्या रेशमी पलंगावर बसली होती. तिच्या हातात एक प्राचीन पुस्तक होतं आणि ती पुस्तकातील पानं उलटत होती. तिचे डोळे उत्साहाने चमकत होते.

ती जेव्हा जवळच्या जंगलात जायची तेव्हा तिच्या उपस्थितीत जंगलातील प्रत्येक प्राणी आणि झाड जणू स्वागतासाठी थांबायचे. तिचे सौंदर्य एखाद्या दैवी चित्रासारखे होते: नैसर्गिक, पण रहस्यमयी!

तिची उंच, सडपातळ देहयष्टी जंगलातील उंच वृक्षांशी जणू स्पर्धा करायची. तिची त्वचा मऊ, सोनेरी-कांस्य रंगाची होती, जणू सूर्याने तिला स्वतःच्या किरणांनी रंगवले होते. तिचे लांब, काळे केस रेशमासारखे चमकत, खांद्यांवरून खाली लहरत होते, आणि जेव्हा ती चालत होती, तेव्हा ते हवेत लयबद्ध डोलत असत. तिचे डोळे मोठे आणि गूढ हिरव्या रंगाचे होते, जणू त्या डोळ्यांत संपूर्ण जंगलाचे रहस्य सामावले होते. तिच्या सौम्य आणि ठाम नजरेत मनातील निश्चय दिसून यायचा. तिच्या चेहऱ्यावर नेहेमी एक नाजूक स्मितहास्य असायचे आणि तेव्हा गालावर सुंदर खळी पडत असे, जे तिच्या आत्मविश्वासाला आणि सौंदर्याला आणखी खुलवत असे.

तिचे ओठ अगदी गुलाबाच्या पाकळ्यांसारखे नाजूक होते. जेव्हा ती बोलायची, तेव्हा तिचा आवाज मधुर पण तरीही खणखणीत होता,

जणू जंगलातील पक्ष्यांचे आत्मविश्वासपूर्ण गाणे तिच्या शब्दांत उतरायचे. तिचा आवडीचा पोशाख म्हणजे पाचूसारख्या हिरव्या रंगाचा झगा जो तिच्या सौंदर्याला साजेसा होता, आणि त्यावर चांदीच्या धाग्यांनी विणलेली नक्षी आकाशातील ताऱ्यांसारखी चमकत असे.

तिच्या गळ्यातील रत्नाचा हार तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक रहस्यमयी आकर्षण प्रदान करत होता. क्लिओपात्रा केवळ सौंदर्याची मूर्ती नव्हती; तिचे व्यक्तिमत्त्व तितकेच प्रभावी होते. ती बुद्धिमान आणि धैर्यशील होती, आणि प्रत्येक परिस्थिती शांतपणे आणि विचारपूर्वक हाताळत असे. तिच्या बोलण्यात एक आंतरिक आत्मविश्वास होता, जो कोणाच्याही मनात ऊर्जा निर्माण करत असे. ती कधीही घाईघाईने निर्णय घेत नसे; प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकत असे. तिच्या स्वभावात एक करुणा होती, जी तिच्या जंगलातील प्राण्यांशी मैत्री करताना दिसून येत होती. ती प्रत्येक प्राण्याशी, मग तो कितीही लहान किंवा मोठा असो, प्रेमाने आणि आदराने वागत असे. तिच्या या गुणामुळे जंगलातील प्राणी तिला आपली मैत्रीण मानत होते. तिच्या शब्दांमध्ये एक जादू होती, जी ऐकणाऱ्याच्या मनाला भुरळ घालत असे. पण ती कधीही आपल्या सौंदर्याचा किंवा बुद्धीचा गर्व करत नसे; तिच्या स्वभावात एक नम्रता होती, जी तिला खऱ्या अर्थाने महान बनवत होती.

आणि आता तिच्या मनात त्या प्राचीन पुस्तकातील "ब्लड स्टोन" ची कथा घुमत होती. त्या रत्नाची शक्ती तिला अस्वस्थ करत होती, पण त्याचबरोबर तिच्या साहसी मनाला आकर्षितही करत होती.

तिने आपली विश्वासू सेविका, मायरा, हिला हाक मारली. मायरा, एक साधी परंतु बुद्धिमान आणि निष्ठावान तरुणी, तिच्या राणीच्या प्रत्येक

इशाऱ्यावर लक्ष ठेवत असे. ती खोलीत प्रवेशली, तिच्या हातात चौकोनी निळसर काचेत ठेवलेला दिवा होता, ज्याच्या मंद प्रकाशात तिचा चेहरा उजळून निघाला.

"मायरा," क्लिओपात्राने शांत पण ठाम आवाजात म्हटले, "मला एका साहसासाठी तयार व्हायचं आहे. मी चंद्र बेटावर जाणार आहे."

मायरा थबकली. तिच्या डोळ्यांत भीती आणि काळजी दिसत होती. "चंद्र बेट, मालकीण? तिथे भयंकर प्राणी राहतात, असं म्हणतात. मीही तुमच्यासोबत येते, मालकीण. हा प्रवास धोक्याचा आहे."

क्लिओपात्राने तिच्याकडे पाहिलं आणि हलकेच हसली. "नाही, मायरा. हा माझा प्रवास आहे, आणि मी एकटीच जाणार आहे. तुझी निष्ठा मला माहित आहे, पण मला स्वतःला सिद्ध करायचं आहे. तू इथे रोमग्रीप्टसमध्ये राहा आणि माझ्या अनुपस्थितीत आई बाबांची काळजी घे."

मायरा गप्प झाली. तिच्या मनात शंका आणि काळजी होती, पण ती राजकुमारीच्या निर्णयाविरुद्ध बोलू शकत नव्हती. "पण मालकीण, जर तुम्हाला काही झालं तर?" ती कुजबुजली.

क्लिओपात्राने तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाली, "मायरा, मी क्लिओपात्रा आहे. माझ्या नशिबात विजय लिहिलेला आहे. तू फक्त माझी वाट पाहा. मी आईला याबद्दल विचारते!"

रोमग्रीप्टस राज्य, जिथे प्राचीन जादू आणि परंपरांचा संगम होता, तिथे क्लिओपात्राची आई, राणी इस्मेराल्डा, एक दृढनिश्चयी आणि बुद्धिमान शासक म्हणून राज्य करत होती. रोमग्रीप्टस हे एक असं राज्य होतं जिथे फक्त स्त्रियाच सिंहासनावर बसत असत, आणि ही परंपरा

शतकानुशतके चालत आली होती. या परंपरेनुसार, राणी इस्मेराल्डाने आपली मुलगी क्लिओपात्राला एक सक्षम आणि स्वतंत्र नेतृत्वाची वारसदार म्हणून तयार केलं होतं. राणी इस्मेराल्डाने क्लिओपात्राला लहानपणापासूनच युद्धकला, जादू आणि नेतृत्वाचे धडे दिले होते. ती आपल्या मुलीच्या सौंदर्याबरोबरच तिच्या बुद्धिमत्तेची आणि धैर्याची कदर करत होती. जेव्हा क्लिओपात्राने आईला चंद्र बेटावर जाण्याची परवानगी मागितली तेव्हा आईला तिचा अभिमान वाटला. चंद्र बेटावर जाणं हे केवळ एक साहस नव्हतं, तर क्लिओपात्राच्या क्षमतेची खरी कसोटी होती. राणीला विश्वास होता की, क्लिओपात्रा ब्लड स्टोन मिळवण्यास सक्षम आहे आणि ती रोमग्रीप्टसच्या परंपरेला पुढे नेऊ शकते.

राणी इस्मेराल्डा एक दूरदृष्टी असलेली शासक होती. तिला माहीत होतं की, क्लिओपात्राला केवळ रोमग्रीप्टसच्या सावलीत राहून नाही, तर स्वतःच्या कर्तृत्वाने आपली ओळख निर्माण करावी लागेल. चंद्र बेटावर जाणं हे तिच्यासाठी एक संधी होती—स्वतःला सिद्ध करण्याची! इस्मेराल्डाला आपली मुलगी भविष्यात एक स्वतंत्र आणि सक्षम राणी बनावी असं वाटत होतं. हेच मत क्लिओपात्राच्या वडिलांचे सुद्धा होते. क्लिओपात्राला चंद्र बेटावर जाण्याची परवानगी देताना राणी इस्मेराल्डाने तिला सांगितलं, "प्रिय क्लिओपात्रा, तुझं सौंदर्य आणि बुद्धी तुझी सर्वात मोठी शक्ती आहे, पण तुझं हृदय तुला मार्ग दाखवेल. चंद्र बेटावर जा, ब्लड स्टोन मिळव, आणि रोमग्रीप्टसच्या परंपरेला पुढे ने. मी तुझ्यावर विश्वास ठेवते."

मग तिने तिच्या मोठ्या रत्नजडीत लाकडी पेटीतून एक सोनेरी मोती असलेला बाजूबंद काढला आणि म्हणाली, "हे तुझ्या दंडावर बांध. यामुळे तू सुरक्षित राहशील! आणि हो त्रिबूकला भेट द्यायला विसरू नकोस. मी निरोप पाठवला आहे."

प्रकरण 2

रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी, जेव्हा संपूर्ण रोमग्रीप्टस नगरी निद्राधीन होती, तेव्हा क्लिओपात्रा राजवाड्यातून बाहेर पडली. तिने आवडीचा पण मजबूत पोषाख परिधान केला होता. तिने सोबत विविध चिन्हे असलेली एक पेटी घेतली होती, ज्यात प्रवासासाठी सर्व आवश्यक सामान होतं. तिच्या कमरेला जादुई तलवार बांधलेली होती, ज्याची मूठ जंगलातील प्राचीन चिन्हांनी सजलेली होती.

आता मेडिटेरनियन समुद्राच्या शांत, पण रहस्यमयी प्रवाहावर, एक लहान, प्राचीन लाकडी नाव शांतपणे पाण्याला चिरत पुढे सरकत होती. नावेच्या पुढच्या टोकावर क्लिओपात्रा बसली होती, तिची सौम्य, पण ठाम नजर क्षितिजावर स्थिरावली होती. तिच्या हातात एक प्राचीन चर्मपत्र होतं, ज्यावर ब्लड स्टोनचं चित्र कोरलेलं होतं—एक लाल रंगाचे रत्न! तिच्या सौंदर्याने मेडिटेरनियनच्या किनाऱ्यावरचा अंधारही उजळला होता, पण क्लिओपात्राच्या डोळ्यांत एक दृढ निश्चय चमकत होता—चंद्र बेटावर पोहोचण्याचा आणि ब्लड स्टोन मिळवण्याचा!

नाव चालवणारा नाविक, एक म्हातारा माणूस, ज्याचं नाव लिओडस होतं, गप्प बसून नावेचे पीळ हलवत होता. त्याच्या चेहऱ्यावर वयाच्या आणि अनुभवाच्या रेषा खणलेल्या होत्या, आणि त्याच्या डोळ्यांत मेडिटेरनियनच्या रहस्यमयी गूढतेची छाया दिसत होती. क्लिओपात्राने त्याला भरपूर सोन्याच्या नाण्यांनी खूश केलं होतं, पण त्याच्या मनात एक अनामिक भीती दडलेली होती. मेडिटेरनियनचा प्रवाह शांत होता, पण रात्रीच्या गडद अंधारात आणि दाट धुक्याच्या पडद्यात,

प्रत्येक सावलीत धोका लपलेला वाटत होता. समुद्राच्या काठावरची झाडं जणू कुजबुजत होती, आणि हवेत एक गूढ शांतता पसरली होती. क्लिओपात्रा एकटीच होती, पण तिच्या मनात कोणतीही भीती नव्हती. ती त्या चर्मपत्राकडे पाहत होती, ज्यावर असलेलं ब्लड स्टोनचं चित्र तिच्या मनाला भुरळ घालत होतं. अचानक, नाविक लिओडसने नावेचे पीळ थांबवले. त्याचा चेहरा पांढरा फटक पडला होता, आणि त्याचे हात थरथर कापत होते. तो घाबरलेल्या, स्वरात म्हणाला, "राजकुमारी, पुढे धुके खूपच दाट आहे. आणि... आणि मला काही विचित्र आवाज ऐकू येत आहेत. हे काहीतरी अशुभ सूचक आहे. आपण परत फिरावं का?"

क्लिओपात्राने त्याच्याकडे कठोर, पण शांत नजरेने पाहिलं. तिच्या डोळ्यांत भीतीचा लवलेशही नव्हता. तिच्यात प्रचंड आत्मविश्वास शिरला, तेव्हा उजव्या हातातले बाजूबंद चमकले. त्याला दुसऱ्या हाताने स्पर्श करत ती म्हणाली, "नाव चालव, लिओडस. तुझी भीती मला थांबवू शकणार नाही. माझा निश्चय मला चंद्र बेटावर घेऊन जाईल."

पण त्या क्षणी, धुक्यातून एक भयंकर, कर्कश किंकाळी समुद्राच्या पाण्यावर घुमली. आवाज इतका भेदक होता की, नाविक लिओडसने आपले हात डोक्यावर ठेवले आणि खाली बसला, जणू तो आगामी संकटापासून लपण्याचा प्रयत्न करत होता. क्लिओपात्राने तात्काळ सोबत आणलेला आपला जादुई खंजीर हातात घेतला, त्याचे चमकणारे पाते धुक्यात चमकले. तिचे डोळे सावध झाले, पण तिच्या चेहऱ्यावर एक निश्चयी स्मितहास्य उमटलं. ती नावेच्या काठावर उभी राहिली, तिचा झगा हवेत लहरत होता. धुक्यातून एक प्रचंड सावली हळूहळू आकार

घेऊ लागली. ती इतकी विशाल होती की, समुद्राच्या पाण्यावर तिचे प्रतिबिंब पडताच लाटा उसळल्या. सावलीतून दोन लाल रंगाचे डोळे चमकले, जणू ते धुक्याला भेदून क्लिओपात्राच्या आत्म्यापर्यंत पोहोचत होते. घाबरून लिओडस किंचाळला.

क्लिओपात्राने खंजीर पुढे धरला आणि ती ठाम, पण शांत आवाजात म्हणाली, "तू कोण आहेस, आणि माझ्या मार्गात का आलास? बोल, नाहीतर माझ्या खंजीराची तिखट चव तुला चाखावी लागेल!"

धुक्यातून एक खर्जा, गंभीर आवाज घुमला, जणू तो समुद्राच्या खोल गर्भातून येत होता. "मी आहे मेडिटेरनियनचा रक्षक, प्राचीन शक्तींचा पहारेकरी. तुझा हा प्रवास धोक्याचा आहे, राजकुमारी. चंद्र बेटावर जाण्याची हिम्मत करणारे फार कमी जण परत आले आहेत. परत जा, नाहीतर तुझा अंत अटळ आहे."

क्लिओपात्राच्या नाजूक ओठांवर एक निर्भय हास्य उमटलं. तिने आत्मविश्वासाने आपला खंजीर हवेत फिरवला आणि तिचे बाजूबंद क्षणभर चमकले, जणू ते तिच्या शब्दांना बळ देत होते. तिने बाजूबंदला हात लावला आणि म्हणाली, "कधीतरी माझा अंत ठरलेला आहेच, पण तो आज नाही! मला ब्लड स्टोन हवा आहे, आणि मी चंद्र बेटावर जाणारच. तुझ्या धमकीने माझा मार्ग बदलणार नाही!"

तिच्या ठाम शब्दांनी धुके हलके हलके विरळ होऊ लागले, आणि रक्षकाचा आकार स्पष्ट दिसू लागला. तो एक विशाल, सर्पासारखा प्राणी होता, ज्याची खवले जादुई प्रकाशाने चमकत होती. त्याचे डोळे लाल रंगाने तळपत होते, पण क्लिओपात्राच्या नजरेत कोणतीही भीती

नव्हती. तिने पुन्हा आपल्या बाजूबंदला स्पर्श केला आणि त्यातून निघालेल्या निळ्या प्रकाशाने त्या रक्षकाच्या डोळ्यांना दिपवून टाकले. रक्षकाने एक दीर्घ, गंभीर श्वास घेतला, आणि त्याच्या आवाजात आता क्रोधापेक्षा आदर जास्त होता!

"तुझी हिम्मत मला आवडली, राजकुमारी," तो म्हणाला. "पण लक्षात ठेव, ब्लड स्टोनच्या मार्गावर फक्त धोका नाही, तर विश्वासघातही आहे. तुझ्या हृदयातील निश्चय आणि तुझ्या बाजूबंदाची शक्ती तुला पुढे नेईल, पण तुझ्या आजूबाजूला डोळे उघडे ठेव. या मार्गावर प्रत्येक सावलीत कपट दडलेलं आहे."

क्लिओपात्राने आपला खंजीर खाली केला आणि म्हणाली, "तुझ्या सल्ल्याबद्दल आभार, रक्षक! पण माझं ध्येय मला नक्की मार्ग दाखवेल. आता मला पुढे जाऊ दे."

रक्षकाने आपलं डोकं खाली केलं, जणू तो तिच्या निश्चयाला मान देत होता. धुके पूर्णपणे विरळ झाले, आणि मेडिटेरनियनचा प्रवाह पुन्हा शांत झाला. रक्षकाची सावली हळूहळू पाण्यात मिसळली, आणि जाण्यापूर्वी त्याचा शेवटचा आवाज आला जणू पाण्यातून दबकी कुजबूज येत आहे. "जा, राजकुमारी. चंद्र बेट तुझी वाट पाहत आहे. पण सावध राहा."

क्लिओपात्राने लिओडसकडे पाहिलं, जो अजूनही भयभीत होता.

ती म्हणाली, "लिओडस, नाव चालव. आपला प्रवास आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे."

लिओडसने कशीबशी आपली भीती गिळली आणि नाव पुन्हा पुढे सरकवली. क्लिओपात्राने चर्मपत्राकडे पुन्हा एकदा पाहिलं, आणि तिच्या मनात एकच विचार होता: ब्लड स्टोन आणि चंद्र बेट. तिला कळून चुकले होते की, पुढे आणखी धोके आणि विश्वासघात तिची वाट पाहत होते, पण तिच्या हृदयातील निश्चय आणि तिच्या आईच्या बाजूबंदाची शक्ती तिला पुढे नेत होती!

प्रकरण 3

काही तासांच्या प्रवासानंतर, समुद्राच्या मध्यभागी एक छोटं, पण रहस्यमयी बेट दिसू लागलं: त्रिबूक बेट, रोमग्रीप्टसच्या मालकीचं ठिकाण, जिथे प्राचीन जादू आणि निसर्गाचा संगम होता. बेटाच्या काठावर उंच, चमकणारी झाडं उभी होती, ज्यांची पानं चंद्रप्रकाशात निळ्या-हिरव्या रंगाने चमकत होती. हवेत एक गोड सुगंध पसरला होता, जणू फुलांनी आणि फळांनी भरलेलं बेट तिच्या स्वागतासाठी तयार होतं. समुद्राच्या पाण्यावर बेटाचे प्रतिबिंब पडत होते, आणि त्यातून एक जादुई तेज बाहेर पडत होतं.

क्लिओपात्राने लिओडसला नाव बेटाच्या काठावर लावण्यास सांगितलं. "लिओडस, इथे थांबूया. हे बेट आपल्या प्रवासात महत्त्वाचं ठरेल," ती शांतपणे म्हणाली. लिओडसने संशयाने तिच्याकडे पाहिलं!

बेटावर पाय ठेवताच, क्लिओपात्राला एक अनोखी शक्ती जाणवली. जमिनीवर पसरलेली फुलं जणू जादुई प्रकाशाने चमकत होती, आणि झाडांवर लटकणारी फळं—रक्तलाल, नीलमणी निळी आणि सोनेरी रंगाची—जणू स्वतःच्या इच्छेने तिच्याकडे आकर्षित होत होती. हवेत एक मधुर संगीत तरंगत होतं, जणू बेट स्वतःच तिच्याशी बोलत होतं.

बेटाच्या मध्यभागी एक छोटी, पण भव्य झोपडी होती, ज्याच्या भिंतींवर जादुई चिन्हं कोरलेली होती. तिथे क्लिओपात्राला एक उंच, रुबाबदार व्यक्ती भेटली—झारु, त्रिबूक बेटाचा जादूगार. त्याचा पांढरा झगा चंद्रप्रकाशात चमकत होता, आणि त्याच्या डोळ्यांत एक प्राचीन

ज्ञान लपलेलं होतं. त्याच्या बाजूला एक पांढरा शुभ्र घोडा उभा होता, ज्याचं नाव क्रिस्टल होतं. क्रिस्टलच्या मानेतून जादुई प्रकाश निघत होता, आणि त्याचे डोळे जणू ताऱ्यांप्रमाणे चमकत होते.

"स्वागत आहे तुमचं, रोमग्रीप्टसची राजकुमारी," झारुने मधुर, पण गंभीर आवाजात म्हटलं. "मी तुझी वाट पाहत होतो. वेगाने उडणाऱ्या निळ्या अँटिक्लिप पक्ष्याने तुझा संदेश माझ्यापर्यंत वेळेवर पोचवला. तुझ्यासाठी घोडा तयार आहे. मात्र चंद्र बेटाचा आणि ब्लड स्टोनचा मार्ग धोक्यांनी भरलेला आहे, तेव्हा सावध रहा!"

क्लिओपात्राने सावध नजरेने त्याच्याकडे पाहिलं. तिच्या मनात रक्षकाचे शब्द घुमत होते—विश्वासघात. ती म्हणाली, "झारु, या घोड्याबद्दल धन्यवाद."

झारुने स्मितहास्य केलं, "मी तुमच्या आई, महाराणी इस्मेराल्डापासून रोमग्रीप्टसचा निष्ठावान सेवक आहे, आणि माझा उद्देश तुला चंद्र बेटावर पोहोचवणं आहे. तुमच्या ध्येयाची पूर्तता ही रोमग्रीप्टसच्या भविष्याची हमी आहे!"

झारुने क्लिओपात्रा आणि लिओडसला आपल्या ट्री हाऊस मध्ये नेलं. तिथे त्याने त्यांना त्रिबूक बेटावरील अद्भुत फळं आणि फुलं दिली. ही फळं—सोनेरी रंगाची अमृतफळं आणि निळ्या रंगाची ताराफळं—जादुई गुणांनी युक्त होती. त्यांचा एक घास घेताच क्लिओपात्राला तिच्या मनात एक नवीन ऊर्जा जाणवली. तिचा आत्मविश्वास वाढला, आणि तिच्या बाजूबंदातून निघणारा प्रकाश अधिक तेजस्वी झाला. लिओडस, जो अजूनही रक्षकाच्या भयाने

थरथरत होता, त्यानेही फळं खाल्ली, आणि त्याच्या चेहऱ्यावर एक नवीन धैर्य उमटलं!

"ही फळं आणि फुलं त्रिबूक बेटाची देणगी आहेत,", झारु म्हणाला. "ही तुझ्या प्रवासात तुला बळ देतील. पण लक्षात ठेव, राजकुमारी, तुझ्या हृदयातील निश्चय हीच तुझी खरी शक्ती आहे. फक्त आत्मविश्वास गमावू नकोस, नाहीतर आपल्यातील शक्ती दुर्बल आणि निष्प्रभ होतात."

क्लिओपात्राने तिथले एक जादुई फूल आपल्या केसांत माळलं, आणि त्याचा गोड सुगंध तिच्या मनाला शांत करत होता. ती म्हणाली, "झारु, तुझ्या आतिथ्याबद्दल आभार. आता मला निघायला हवं. जास्त वेळ थांबता यायचं नाही"

झारुने आपला हात क्रिस्टलच्या मानेवर ठेवला, आणि तो घोडा जणू तिच्या आज्ञेची वाट पाहत होता. झारु म्हणाला. "तो निश्चयी घोडा आहे, जो जंगलातील सर्वात कठीण मार्गांवर तुला मार्गदर्शन करेल आणि तुझ्या प्रवासासाठी मी तुला आणखी एक नाव देतो, ज्यात हा क्रिस्टल प्रवास करेल. तुमची नाव या घोड्याच्या नावेला जोडा!"

झारुने त्यांना बेटाच्या दुसऱ्या काठावर नेलं, जिथे एक नाव तयार होती. ही नाव मजबूत लाकडापासून बनवलेली होती. तिच्यावर चांदीच्या धाग्यांनी काही चिन्हं कोरलेली होती. ती पाण्यावर तरंगत होती, जणू ती स्वतःच चंद्र बेटाच्या दिशेने जाण्यास उत्सुक होती. क्रिस्टलला दुसऱ्या नावेत चढवण्यात आलं आणि दोन्ही नाव जोडण्यात आल्या. दोन्ही नावा—लिओडसची लहान नाव आणि झारुने दिलेली नाव—मेडिटेरनियनच्या प्रवाहावर एकत्र पुढे सरकत होत्या. क्रिस्टल शांतपणे

उभा होता, पण त्याचे डोळे जंगलाच्या दिशेने स्थिर होते, जणू तो पुढील धोक्यांची चाहूल घेत होता. क्लिओपात्राने आपला नकाशा उघडला, आणि त्यावर चंद्र बेटाचा मार्ग चमकत होता. ती स्वतःशीच पुटपुटली, "आता आपण जवळ आलो आहोत. लवकरच ब्लड स्टोन माझ्या हातात येणार आहे."

रात्रीच्या शेवटच्या प्रहरात, जेव्हा चंद्र आकाशात सर्वात तेजस्वी होता, दोन्ही नावा चंद्र बेटाच्या काठावर पोहोचल्या. बेटाचा किनारा जादुई प्रकाशाने उजळला होता, आणि तिथे लिमा या जादूविद्येच्या संस्थापक स्त्रीचा पुतळा उंच उभारलेला होता. तिच्या सावलीने क्लिओपात्राच्या मनात एक थरार निर्माण केला. तिने क्रिस्टलच्या मानेला हलकेच थोपटलं आणि म्हणाली, "आता खरा प्रवास सुरू होतो, माझ्या मित्रा."

लिओडसने दोन्ही नावा काठाला लावल्या, आणि क्लिओपात्रा बेटावर उतरली. पण बेटावर पाय ठेवताच, हवेत एक गूढ शांतता पसरली. कुठेतरी दूरवर एक कर्कश आवाज घुमला, आणि क्रिस्टलचे कान सावधपणे हलले. क्लिओपात्राने आपला खंजीर हातात घेतला आणि लिओडसकडे पाहिलं. "सावध राहा, लिओडस. रक्षकाने सांगितलं होतं—प्रत्येक सावलीत कपट आहे!"

तिच्या शब्दांनी लिओडसच्या चेहऱ्यावर भीती परतली, पण क्रिस्टलने एक दीर्घ खणखणीत खिंकाळी काढली, जणू तो धोक्याला सामोरं जाण्यास तयार होता. चंद्र बेटाच्या गुहेकडे जाणारा मार्ग नकाशाप्रमाणे आता दिसत होता.

प्राचीन काळात, जादू ही केवळ एक कला नव्हती, तर ती जीवनाचा अविभाज्य भाग होती. त्या काळात जादूची उपासना करणारे दोन भिन्न पंथ प्रबळ होते, ज्यांचे विचार आणि उद्देश एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे होते. हे दोन पंथ जंगलाच्या प्राचीन शक्तींवर आधारित होते आणि त्यांचा प्रभाव रोमग्रीप्टस आणि आसपासच्या राज्यांवर पसरला होता. या दोन्ही पंथांनी जादूचा उपयोग वेगवेगळ्या मार्गांनी केला.

उबुंटू पंथ हा जंगलाच्या प्राकृतिक शक्तींवर विश्वास ठेवणारा आणि त्यांचा उपयोग निसर्ग, प्राणी आणि मानवजातीच्या कल्याणासाठी करणारा पंथ होता. या पंथाचे अनुयायी, ज्यांना "प्रकाशाचे रक्षक" म्हणून ओळखलं जायचं, जादूचा उपयोग उपचार, संरक्षण आणि समृद्धीसाठी करत. ते जंगलातील प्राचीन वृक्ष, नद्या आणि पवित्र फुलांमधील जादुई शक्तींना पूजत. उबुंटू पंथाचे जादूगार त्यांच्या जादुई मंत्रांनी आणि प्रतीक चिन्हांनी जंगलातील संतुलन राखत.

क्लिओपात्रा आणि तिची आई, राणी इस्मेराल्डा, या उबुंटू पंथाच्या अनुयायी होत्या. त्यांचा विश्वास होता की जादू ही निसर्गाची देणगी आहे, जी मानवजातीच्या भल्यासाठी वापरली पाहिजे. उबुंटू पंथाच्या जादूगारांनी इस्मेराल्डा हिला जादुई तलवार, बाजूबंद अशा अनेक गोष्टी दिल्या होत्या.

दुसरीकडे होता इनकुबू पंथ.

हा जंगलातील गडद शक्तींवर आधारित होता, आणि त्याचे अनुयायी, ज्यांना "अंधाराचे शिकारी" म्हणून ओळखलं जायचं, जादूचा उपयोग सत्ता, वर्चस्व आणि विनाशासाठी करत. हा पंथ जंगलातील गुप्त

आणि सुप्त शक्तींना पूजत होता, आणि त्यांचा विश्वास होता की त्या शक्तीने ते संपूर्ण जंगल आणि रोमग्रीप्टसवर वर्चस्व गाजवू शकतील.

त्यांचे जादूगार कपटी आणि मत्सरी होते!

दोन्ही पंथांकडे जादूच्या उपासनेसाठी आवश्यक असलेली प्राचीन पुस्तके आणि ब्लड स्टोन आणि त्यासारख्या इतर अनेक जादुई शक्तींनी भरलेल्या गुप्त आणि प्रकट गोष्टींची माहिती आणि ते मिळवण्याचे मार्ग सांगणारी पुस्तके होती. त्या आधारे दोन्ही पंथ एकमेकांवर कुरघोडी करत आणि प्रसंगी युद्ध करून आपापल्या पंथामध्ये जास्तीत जास्त आणि वेगवेगळ्या जादुई शक्ती असलेल्या गोष्टींचा आणि शक्तींचा संचय करण्याची त्यांच्यात चढाओढ लागे.

प्रकरण 4

रात्रीच्या गडद अंधारात, चंद्र बेटाच्या किनाऱ्यावर पोचताच अचानक लिओडसने क्लिओपात्राकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यांत एक गूढ चमक होती. “राजकुमारी,” तो म्हणाला, “मला थोडा आराम हवा आहे. इथे किनाऱ्यावरच्या जंगलात एक निर्जन भाग आहे. नाव बांधून मी तिथे विश्रांती घेतो. मी थकलोय आता! तुम्ही पुढे बेटावर जा!"

क्लिओपात्राने त्याच्याकडे संशयाने पाहिलं. तिच्या मनात मेडिटेरनियनच्या रक्षकाचे शब्द घुमत होते, “प्रत्येक सावलीत कपट दडलेलं आहे.” पण तिने आपली भावना लपवली आणि शांतपणे म्हणाली, “ठीक आहे, लिओडस. मी क्रिस्टलला सोबत घेऊन पुढे जाते.”

तिथल्या हवेत एक गूढ शांतता होती, आणि समुद्राच्या पाण्यावर चंद्राचा प्रकाश चमकत होता. क्लिओपात्रा क्रिस्टलच्या मानेला थोपटत उभी राहिली.

लिओडसने आपली पिशवी खांद्यावर घेतली आणि म्हणाला, “मी किनाऱ्यावर थोडं चालतो आणि मग आराम करण्यासाठी जातो. तुम्ही व्हा पुढे.” पण त्याच्या पावलांमध्ये एक विचित्र घाई होती.

क्रिस्टलवर स्वार होऊन क्लिओपात्रा बेटावरच्या जंगलाकडे मार्गक्रमण करू लागली. क्लिओपात्रा नजरेच्या आड झाल्यावर अचानक, लिओडसने समुद्राच्या काठावर उभं राहून एक दीर्घ श्वास घेतला, आपली पिशवी खाली ठेवली, आणि एका क्षणात, त्याने मेडिटेरनियनच्या खोल पाण्यात उडी मारली. पाण्याचा आवाज झाला,

आणि त्या क्षणी, पाण्याच्या पृष्ठभागावर एक जादुई प्रकाश चमकला, आणि लिओडसचं मानवी रूप गायब झालं! त्याच्या जागी एक प्रचंड समुद्री घोडा दिसत होता. त्याची खवले चंद्रप्रकाशात चमकत होती, आणि त्याचे डोळे लाल रंगाने तळपत होते.

समुद्री घोड्याने एक कर्कश खिंकाळी काढली, आणि पायांनी पाणी उडवत तो त्या गूढ आणि खोल समुद्रात गायब झाला.

क्रिस्टलवर स्वार होऊन क्लिओपात्रा पुढे असलेल्या जंगलात शिरली. तिला एक गूढ शक्ती जाणवली. मग तिने पेटीतून तामरी नावाचे एक चोकोनी आकाराचे लांब वाद्य काढले आणि बोटांनी त्याच्यावर विशिष्ट ठिकाणी टप टप वाजवत राहिली. त्यातून अद्भुत मधुर लहरी निघाल्या आणि त्या स्वराने जंगलातील प्रवेशाच्या भागातील अनेक प्राणी आणि पक्षी शांत होऊन तिच्याभोवती जमा झाले. त्यांना थोपटून त्यांचे लाड करून तिने परत पाठवले.

नंतर तिने आपला नकाशा उघडला, आणि त्यावर ब्लड स्टोन असलेल्या प्राचीन गुहेचा मार्ग चमकत होता. पण गुहेपर्यंत पोहोचण्यापूर्वी, तो मार्ग ती जंगलानंतर एका मोकळ्या मैदानातून जात होता. त्या मोठ्या मैदानानात, चंद्र प्रकाशात, लाकडांच्या ज्वाळांनी भगभगलेल्या भव्य शेकोटीभोवती, जादूगारांचा मेळावा चालू होता. त्या विशाल अग्निकुंडाच्या भोवती अनेक जादूगार गोल करून नाचत होते, त्यांच्या हातातील सर्पाचे तोंड असलेल्या पिवळ्या काठ्या चमकत होत्या—इनकुबू पंथाचे प्रतीक!

हवेत गडद मंत्रांचा गूंज घुमत होता. काही जादूगारांच्या हातातल्या मातीच्या कपात झिंग आणणारे त्रायोझा नावाचे पेय

होते. जंगलातील अनेक प्राणी हा सोहळा बघण्यासाठी आजूबाजूला जमलेले होते. त्या प्राण्यांचे डोळे अंधारात चमकत होते. त्यातल्या रान मांजरी आनंदाने पुढचे दोन्ही पाय वर करून थिरकत होत्या.झाडावरच्या रानटी पक्ष्यांना आनंदाचे भरते आलेले होते आणि ते त्या अग्नीतून हवेत निघणाऱ्या पिवळट धुराच्या वर उडत उडत जमा होऊन पंख हलवत चोचीतून विचित्र सूर आवळत होते.

मेळाव्याच्या मध्यभागी एक उंच, रुबाबदार व्यक्ती उभी होती— मोरोगो मोया, इनकुबू पंथाचा एक कपटी नेता आणि इथल्या जादूगारांच्या टोळीचा प्रमुख. त्याचा गडद लाल झगा चमकत होता, आणि त्याच्या हातातील काठी नाचवत झिंगत झिंगत तो त्या जादूगारांच्या वर्तुळामध्ये नाचत होता. आपल्या रुबाबदार पांढऱ्या घोड्यावर क्लिओपात्रा हळूहळू तिकडे जात होती तेव्हा तिला आश्चर्य वाटले की, नेमकी मी ब्लड स्टोन घेण्यासाठी आले तेव्हाच ही इनकुबू मंडळी इथे कशी काय हजार झाली? लिओडसने आपल्याला धोका दिला का?

मोरोगो मोयाने तिच्याकडे पाहत, त्याच्या चेहऱ्यावर खोटं स्मितहास्य उमटवत, हसत तिचं स्वागत केलं आणि तिला अग्निकुंडाजवळ नेलं.

"रोमग्रीप्टसची राजकुमारी, क्लिओपात्रा," तो मधुर पण कपटी आवाजात म्हणाला, "तुझ्या धैर्याची कीर्ती आमच्या इनकुबू पंथापर्यंत पोहोचली आहे. आज आम्ही तुझ्या स्वागतासाठी हा मेळावा आयोजित केला आहे. पाहा, आमच्या शक्तींचं प्रदर्शन!"

तिने घोड्यावर बसूनच मनाविरुद्ध पण कुतुहलाने आणि सावध होऊन तो मेळावा बघायला सुरुवात केली. मोरोगो मोयाच्या इशाऱ्यावर,

पहिल्या जादूगाराने—सिथोने—आपली काठी हवेत उंचावली. त्याच्या काठीतून गडद अग्नीचे गोळे बाहेर पडले, जे लाल, निळे आणि काळे रंग बदलत हवेत नाचू लागले. ते गोळे जंगलाच्या अंधारात चमकत होते, जणू तारे खाली उतरले होते. क्लिओपात्रा प्रभावित झाली, पण तिच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. ती शांतपणे म्हणाली, "प्रभावी जादू सिथो. पण अग्नीची शक्ती फक्त प्रदर्शनासाठी नसते, नाही का?"

सिथोने तिच्याकडे पाहत एक गूढ हास्य दिलं, पण काहीच बोलला नाही. दुसऱ्या स्त्री जादूगाराने—क्वेलाने—आपली काठी हवेत फिरवली, आणि जंगलातील प्राणी—गरुड, साप आणि रानमांजर—तिच्या जादुई मंत्राने हवेत उडू लागले!

तिसऱ्या एका स्त्री जादूगाराने—जाराने—एक जादुई धुके निर्माण केलं, जे अग्निकुंडाच्या भोवती पसरलं. त्या धुक्यात ब्लड स्टोनच्या प्राचीन गुहेच्या भयंकर कथा दिसू लागल्या: प्रचंड सापांचे फूत्कार, गडद सावल्यांचे नृत्य. जाराच्या डोळ्यांत एक कपटी चमक होती, ती म्हणाली, "क्लिओपात्रा, ब्लड स्टोनची गुहा धोक्यांनी भरलेली आहे. तुझ्या धैर्याची खरी कसोटी तिथे होईल."

क्लिओपात्राने धुक्यातील कथा पाहिल्या, आणि तिच्या मनात मेडिटेरनियनच्या रक्षकाचे शब्द घुमले, "प्रत्येक सावलीत कपट दडलेलं आहे." ती शांतपणे म्हणाली, "धोके मला नवीन नाहीत. मी त्या कथांना प्रत्यक्षात सामोरी जाईन."

तिची नजर मोरोगो मोयावर स्थिर होती, ज्याचा चेहरा कपटी खट्याळपणाने उजळला होता. मोरोगो मोयाने, आपल्या हातात एक चमकणारं गडद फूल धरत, क्लिओपात्राच्या पुढे धरलं. फूल चंद्र

बेटावरील गडद फुलांसारखं चमकत होतं, त्याच्या पाकळ्या जणू रात्रीच्या अंधारात ताऱ्यांप्रमाणे तळपत होत्या. तो मधुर आवाजात म्हणाला, "क्लिओपात्रा, हे फूल तुझ्या धैर्याचं प्रतीक आहे. आम्ही तुझ्या ध्येयात तुझ्यासोबत आहोत. ब्लड स्टोनची गुहा धोक्यांनी भरलेली आहे, आणि मी माझ्या सर्वोत्तम जादूगारांना—सिथो, क्वेला आणि जारा—तुझ्यासोबत पाठवतो."

क्लिओपात्राने फूल हातात घेतलं, पण त्या फुलाच्या स्पर्शाने तिच्या बाजूबंदातून एक थंड कंपन जाणवलं, जणू उबुंटू पंथ तिला सावध करत होता. तिने फूल केसात न लावता आपल्या पिशवीत ठेवलं आणि शांतपणे म्हणाली, "तुझ्या आतिथ्याबद्दल आणि मदतीबद्दल आभार, मोरोगो."

मोरोगोच्या डोळ्यांत एक क्षणभर चमक दिसली, जणू त्याला तिच्या सावधगिरीचा अंदाज आला. पण त्याने आपलं कपटी हास्य लपवलं आणि म्हणाला, "नक्कीच, राजकुमारी. सिथो, क्वेला, जारा—क्लिओपात्रासोबत जा, आणि तिच्या ध्येयात तिला मदत करा."

क्लिओपात्रा क्रिस्टलवर बसून चंद्र बेटाच्या त्या गुहेच्या दिशेने निघाली होती, तिच्या पाठीमागे मोरोगो मोयाने पाठवलेले तीन जादूगार—सिथो, क्वेला आणि जारा—वाघासारख्या भव्य रान मांजरांवर बसून येत होते. त्यांच्या चेहऱ्यावर खोटी सौम्यता होती, पण त्यांच्या डोळ्यांत इनकुबू पंथाचे कपट लपले होते. क्लिओपात्राच्या मनात संशय होता, पण तिने आपली भावना लपवली. तिच्या उजव्या हातातील बाजूबंद सावध राहण्याची चेतावनी देत होता. तिने आपला नकाशा उघडला, आणि त्यात ब्लड स्टोन असलेल्या प्राचीन गुहेचा मार्ग चमकत

होता. जंगलातील दाट झाडं आणि गूढ शांतता तिच्या धैर्याची कसोटी पाहत होती.

जंगलातून पुढे जाताना, हवेत एक गडद धुके पसरलं. धुक्यातून कर्कश आवाज येत होते, जणू जंगल स्वतःच तिच्याशी कुजबुजत होतं. सिथोने खोट्या चिंतेने म्हटलं, "राजकुमारी, हे जंगल धोकेदायक आहे. सावध राहा, धुके आपल्याला भटकवू शकते."

क्लिओपात्राने त्याच्याकडे सावध नजरेने पाहिलं आणि आपली जादुई तामरी काढली. तिने बोटांनी टप टप वाजवात एक विशिष्ट स्वर वाजवला, आणि त्या स्वराने एक प्रचंड गरुड हवेतून खाली उतरला आणि त्याचे पंख त्याने त्या धुक्यातून उडत उडत जोरजोरात हलवायला सुरुवात केली. जसे जसे तो पंख हलवत होता तसे तसे ते धुके विरळ होत गेले. शेवटी संपूर्ण धुके पंखांनी धुके दूर केलं, ज्यामुळे गुहेचा मार्ग स्पष्ट दिसला. तो गरुड आला तसा निघूनही गेला.

क्वेलाने तिच्या रान मांजरावरून खाली पाहत म्हटलं, "तुझी तामरी खरोखरच शक्तिशाली आहे, राजकुमारी. पण गुहा अजूनही धोक्यांनी भरलेली आहे."

क्लिओपात्रा शांतपणे म्हणाली, "मला धोक्यांची सवय आहे, क्वेला. असले अडथळे मला थांबवू शकणार नाहीत."

हळूहळू पहाट होत होती.

जंगलातील मार्ग खडबडीत आणि धोकादायक होता. एका ठिकाणी, जमिनीतून प्रचंड मुळं बाहेर आली, ती क्वेलाच्या पायांवर चढली आणि तिला अडवण्याचा प्रयत्न करु लागली. जाराने आपल्या हातातील काठीला स्पर्श केला त्यामुळे तिच्या हातात एक जादुई गोळा

आला. तो तिने मुळांवर फेकला आणि त्यामुळे मुळं आपोआप तुटत गेली आणि तिचा पाय मुक्त झाला.

अखेरीस, क्लिओपात्रा आणि इतर तिघे जादूगार ब्लड स्टोनच्या प्राचीन गुहेच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचली. गुहेच्या तोंडावर प्राचीन चिन्हं कोरलेली होती, आणि हवेत एक थंड, गूढ शक्ती जाणवत होती. तिने पेटीतून सोबत आणलेला आपला प्राचीन मंत्रांचा ग्रंथ उघडला आणि गुहेचं जादुई कवच तोडण्यासाठी एका प्राचीन रॉस्टर शक्तीला आवाहन केले, "हे रॉस्टर, माझ्या हाकेला ऐक. प्रकाशाच्या रक्षकांना मदत कर. या गुहेचा मार्ग मोकळा कर!"

रॉस्टर शक्ती घोंघावत आकाशातील ढगांतून वीजेसारखी लखलखाट करत क्लिओपात्राच्या जिभेवर अवतरली. मग आपोआप तिच्या तोंडातून अद्भुत आवाजात मंत्र निघाले. ते मंत्र वेगाने गुहेच्या प्रवेशद्वारावर धडका मारू लागले! मंत्राच्या शब्दांसह, गुहेच्या प्रवेशद्वारावर चमकणारं जादुई कवच मंदावलं, आणि मार्ग मोकळा झाला. सिथो, क्वेला आणि जारा तिच्या मागे उभे होते, त्यांच्या रान मांजरांनी खणखणीत खिंकाळ्या काढल्या.

क्रिस्टलनेही एक दीर्घ खिंकाळी काढली, जणू तो गुहेच्या धोक्यांची चाहूल घेत होता. क्लिओपात्राने आपली तलवार पुढे धरली आणि तिघांसाहित गुहेच्या आत पाऊल टाकलं...

प्रकरण 5

इकडे लिओडसने रूप बदलून पाण्यात उडी मारली होती कारण तो दूसरा तिसरा कुणी नसून इनकुबू पंथाचा एक कुशल जादूगार होता, जो रूप बदलण्यात निपुण होता. त्याने अनेक महिने रोमग्रीप्टस राज्यात विविध रूपांत घालवले होते—कधी एका सामान्य नावाड्याचं, कधी एका भटक्या व्यापाऱ्याचं, तर कधी भिंतीवरच्या सरड्याचं!

त्याने एकदा रोमग्रीप्टसच्या प्राचीन ग्रंथालयात ब्लड स्टोनच्या रहस्यमयी पुस्तकाला एक सामान्य वाचक बनून अलगद ठेवलं!

कालांतराने ते पुस्तक क्लिओपात्रापर्यंत पोहोचवण्यासाठी एक कुटील योजना आखली. एका रात्री, जेव्हा क्लिओपात्रा ग्रंथालयात अनेक प्राचीन जादूविषयक ग्रंथांचा अभ्यास करत होती, तेव्हा लिओडसने मजबूत शक्तिमान पालीचं रूप घेऊन भिंतीवरून त्या पुस्तकाला क्लिओपात्राच्या पुढे पडेल असं ढकललं. त्या पुस्तकात ब्लड स्टोनच्या चंद्र बेटावरील गुहेच्या रहस्यांचा उल्लेख होता, आणि क्लिओपात्राच्या मनात त्या रत्नाच्या शोधाची ठिणगी पडली. कारण, इनकुबू पंथाच्या जादूगारांमध्ये ब्लड स्टोन हस्तगत करण्याची पात्रता नव्हती. पुढे त्याने क्लिओपात्राला चंद्र बेटावर आणण्यासाठी नावाड्याचं रूप घेतलं. हे सगळं त्याने मोरोगो मोयाच्या सांगण्यावरून केलं होतं!

लिओडस जेव्हा क्लिओपात्राला चंद्र बेटावर घेऊन आला, तेव्हा त्याने मेडिटेरनियन समुद्राच्या पाण्यात उडी मारून समुद्री घोड्याचं रूप घेतलं आणि गुप्तपणे पाण्यातून चंद्र बेटाच्या जवळ असलेल्या एका "त्राहीम" नावाच्या बेटावरच्या मोरोगो मोयाच्या गुप्त निवासस्थानाकडे

निघाला. समुद्राच्या खालून तो एका छोट्या गांडुळाच्या रूपात बदलला आणि पाण्याच्या झऱ्यातून मोरोगो मोयाकडे पोहोचला.

त्याने आपलं तरुण मानवी रूप परत घेतलं आणि खणखणीत हसत म्हटलं, "आपली योजना यशस्वी झाली आहे, मोया! शेवटी क्लिओपात्रा गुहेकडे निघाली आहे तर! ती ब्लड स्टोन मिळवेल, आणि मग आपले तिघे जादूगार तिच्याकडून तो स्टोन हस्तगत करतील!"

प्रकरण 6

गुहा विशाल आणि अंधारी होती.

गुहेच्या आत पाऊल टाकताच, एक गडद कोळयाचं जाळं त्यांच्याभोवती पसरलं. आजूबाजूने कर्कश हास्याचे आवाज घुमत होते, आणि अंधारात भयंकर आकृत्या दिसत होत्या—प्रचंड डोळ्यांचे सावलीचे प्राणी, ज्यांचे पंजे हवेत नाचत होते. क्वेलाने, तिच्या रान मांजरावरून तिरक्या नजरेने पाहत, म्हटलं, "हे धुके भयंकर आहे, राजकुमारी. यात आपण हरवून जाऊ"

क्वेला ही नेहेमी क्लिओपात्राचा आत्मविश्वास कमी होईल असे बोलत असे. कारण जसजसा आत्मविश्वास कमी होईल तसतसा जादुई शक्ती वापरण्याची ताकद कमी होते ही उबुंटू पंथाची कमजोरी तिला चांगली माहीत होती. पण सिथो तिला डोळ्यांनी खुणावत होता की, ही योजना आता नाही तर ब्लड स्टोन मिळाल्यावर तो क्लिओपात्राकडून हस्तगत करण्यासाठी वापरायची. पण क्लिओपात्राचा आत्मविश्वास एवढ्या तेवढ्या नकारात्मक बोलण्याने कमी व्हायचे नाव घेत नव्हता.

क्लिओपात्राने आपल्या खंजिराला हवेत उंचावून डोळे मिटून एका शक्तीचे आवाहन केले आणि खंजिरातून एकाच वेळेस अनेक दिशांना जाड निळी किरणे निघाली आणि त्यांनी ते जाळे कापून काढले.

पुढे काही अंतर गेल्यावर एक प्रचंड भीतीदायक सावली बाहेर आली. ते एक भूत होते!

ते किंचाळले, "या गुहेत प्रवेश करणाऱ्यांना मृत्यू मिळेल!"

क्लिओपात्राने आपली तलवार हवेत फिरवली आणि ठाम आवाजात म्हणाली, “मी रोमग्रीप्टसची राजकुमारी आहे, आणि तुझी धमकी मला थांबवू शकणार नाही!” तिने आपल्या बाजूबंदला स्पर्श केला, आणि त्यातून निळ्या ज्वाळा निघाल्या. पण त्या भुताला त्या थांबवू शकल्या नाहीत. त्या ज्वाळा त्याने हुसकावून दूर फेकल्या!

तेवढ्यात जाराने, आपली काठी हवेत उंचावत, एक जादुई मंत्र उच्चारला, “हे, अंधाराची शक्ती, माझ्या हाकेला साद दे! अंधाराच्या शिकऱ्यांना मदत कर!”

तेव्हा गुहेच्या खडबडीत छतावरून एक मगर सरपटत आली आणि तिने मोठा जबडा काढून आ वसला. त्यात आधी त्या भुताचे दोन्ही डोळे खोबणीतून निघून मगरीच्या तोंडात ओढले गेले आणि त्यानंतर त्याचे हात आणि नंतर पाय! असे करत संपूर्ण भूत मंगरीच्या पोटात ओढले गेले.

पण ती मगर म्हणाली, "माझी भूक संपली नाही, तुम्हा सर्वांना मी खाईन!”

क्लिओपात्रा म्हणाली, "जारा, तुझी अशी अपूर्ण जादू काय कामाची? कसंही करून या मगरीला इथून घालव!"

जाराला ते जमले नाही. तेव्हा क्वेलाने आपला एक भाला तिच्या शेपटीत छतावर खुपसला आणि म्हणाली, "ही मरणार नाही, पण इथेच लटकलेली राहील! चला पुढे जाऊ!"

पुढे गेल्यावर, त्यांना एक खोल खड्डा दिसला, ज्याच्या तळाशी अग्नीच्या ज्वाळा धगधगत होत्या. खड्ड्यावर एक थरथरणारा पूल होता.

सिथोने, घाबरलेल्या आवाजात, म्हटलं, "राजकुमारी, हा पूल धोकादायक आहे. आम्ही परत फिरूया."

पण क्लिओपात्राने त्याच्याकडे तिरस्काराने पाहिलं. "सिथो, जर तुझं हृदय ठिसूळ असेल, तर तू मागे राहा. माझा निश्चय शुद्ध आहे."

अक्वालियाने तिच्या कथेने प्रभावित होऊन सांगितलं, "क्लिओपात्रा, तुझं धैर्य आणि जंगलाचं रक्षण करण्याचा निश्चय आम्हाला प्रेरित करतो. ब्लड स्टोन हा तुझ्यासारख्या चांगल्या व्यक्तीच्या हाती जात होता याचा मला आनंद झाला होता. त्यामुळे तुझ्यासारख्या योग्य आणि लायक व्यक्तीकडून त्या पंचतत्व सापांचा पराभव सुद्धा होवू शकला. अन्यथा त्यांना पराभूत करणे कठीण होते. पण दुर्दैवाने तो तुझ्या हातात येता येता राहिला. आम्ही, पंचतत्वाच्या समुद्री राज्याचे रक्षक, रोमग्रीप्टसशी मैत्रीचा हात पुढे करतो. तुला पुन्हा चंद्र बेटावर परत जाण्यासाठी आम्ही पाण्याचा मार्ग दाखवू. जेथून तू तळ्यात पडलीस तेथून तू पुन्हा त्या गुहेत जाशील! पण एक शपथ घे! कोणत्याही परिस्थितीत तो ब्लड स्टोन शोधून काढ! चुकीच्या लोकांकडे तो गेल्यास प्रचंड अनर्थ ओढावेल!"

क्लिओपात्रा, आनंदाने आणि कृतज्ञतेने, म्हणाली, "राणी अक्वालिया, तुमच्या मैत्रीने माझं हृदय भरलं आहे. मी चंद्र बेटावरच्या गुहेत परत जाईन आणि माझा स्टोन मिळवेन! तो सिथो, क्वेल आणि जारा यांचेकडे आहे म्हणजे इनकुबू पंथकडे!"

निघतांना अक्वालियाने तिला एक शंख दिला, "हा शंख वाजव, आणि आम्ही तुझ्या मदतीला धावून येऊ."

मग तिने दोघांसाठी पाण्यात एक गुप्त मार्ग उघडला. पंचतत्वाच्या समुद्री राज्यातून चंद्र बेटाच्या प्राचीन गुहेत परतण्यासाठी क्लिओपात्रा आणि तिचा विश्वासू साथी, क्रिस्टल, राणी अक्वालियाने उघडलेल्या गुप्त पाण्याच्या मार्गातून प्रवासाला निघाले. क्लिओपात्राच्या हातात अक्वालियाने दिलेली जादुई तलवार चमकत होती, ज्याच्या मुठीवर

पाण्याचं चिन्ह निळ्या प्रकाशाने धगधगत होतं. तिच्या उजव्या हातातील बाजूबंद तिला सतत शक्ती देत होते, आणि तिच्या कमरपट्ट्यात खोचलेला जादुई शंख सुरक्षित होता. क्रिस्टल आपल्या लांब शेपटीने पाण्यात हलक्या लाटा निर्माण करत होता, जणू तो या नव्या साहसासाठी उत्सुक होता. पाण्याखालील विश्व, रंगीबेरंगी माशांनी, चमकणाऱ्या रत्नांनी सजलेलं, एक स्वप्नवत दृश्य होतं. गुप्त पाण्याचा मार्ग, जो अक्वालियाच्या जादूने उघडलेला होता, तो म्हणजे एक चमकणारा निळा प्रवाह होता, जो समुद्राच्या खोलवर सापासारखा वळवळत पुढे सरकत होता. मार्गाच्या दोन्ही बाजूंना प्राचीन दगडी खांब उभे होते, ज्यांच्यावर पाण्याच्या चिन्हांनी कोरलेली शिल्पं चमकत होती. क्लिओपात्रा आणि क्रिस्टल पाण्याच्या प्रवाहात सहज तरंगत पुढे जात होते. तिच्या नव्या शक्तीमुळे म्हणजे अक्वा डोमिनारामुळे ती पाण्याच्या लाटांना आपल्या इच्छेनुसार वळवू शकत होती. मार्गात पुढे जाताना, त्यांना समुद्रातील विविध जीव भेटले, जे एकापेक्षा एक विचित्र आणि मंत्रमुग्ध करणारे होते. ल्यूमिनरी मासे जे छोटे, पारदर्शक होते. त्यांच्या शरीरातून निळा आणि हिरवा प्रकाश बाहेर पडत होता, ते क्लिओपात्राच्या भोवती नाचत होते. त्यांचे पंख, जणू रेशमाचे तुकडे, पाण्यात लहरत होते. एक मासा, धीटपणे, क्लिओपात्राच्या तलवारीजवळ आला आणि तिच्या मुठीवर चमकणाऱ्या चिन्हाला स्पर्श करताच, त्याच्या शरीरातून एक मंद मंत्रमय नाद घुमला.

क्लिओपात्रा हसली, "क्रिस्टल, हे मासे जणू आपल्याला मार्ग दाखवत आहेत!"

पुढे दिसले एक् रत्नजडित कासव, ज्याचं कवच माणकांनी आणि नीलमांनी सजलेलं होतं. त्याचे डोळे, जणू प्राचीन समुद्राची कथा सांगत होते आणि शांतपणे क्लिओपात्राकडे पाहत होते. कासवाने आपलं डोकं हलवलं, आणि त्याच्या कवचातून एक चमकदार प्रकाश बाहेर पडला, ज्याने मार्ग अधिक उजळला. क्रिस्टलने, उत्साहाने, कासवाच्या कवचावर हलकेच पायाचा पंजा मारला, आणि कासवाने एक मंद गुरगुर काढली, जणू त्याला हसू आलं. नंतर भेटला तो मोती मेडुसा, एक विचित्र प्राणी, ज्याच्या डोक्यावर मोतींनी सजलेले लांब धागे लहरत होते. या मेडुसाच्या शरीरातून मंद गुलाबी प्रकाश बाहेर पडत होता, आणि त्याच्या हालचाली पाण्यात नृत्यासारख्या भासत होत्या. त्याने क्लिओपात्राला एक मेडुसा मोती दिला, जो तिने आपल्या कमरपट्ट्याला खोचला. क्लिओपात्रा हसून म्हणाली, “धन्यवाद मेडुसा!" हसली, आणि मेडुसा पाण्यात लहरत गायब झाला. या समुद्री जीवांनी क्लिओपात्राच्या प्रवासाला एक संस्मरणीय रंग दिला, आणि तिच्या मनात रोमग्रीप्टसच्या रक्षणाचा आणि ब्लड स्टोन परत मिळवण्याचा निश्चय अधिक दृढ झाला.

प्रकरण 13

त्यांच्या मार्गाचा शेवट एका प्रचंड पाण्याखालील गुहेकडे होता, जिथे पाणी गडद आणि थंड होत गेलं. गुहेच्या प्रवेशद्वारावर, प्राचीन दगडी शिल्पं, ज्यांच्यावर साप आणि माशांचे चित्र कोरलेले होते, एक भयावह शांतता पसरवत होती. क्रिस्टल आणि क्लिओपात्रा, तिची तलवार हातात घट्ट धरून, सावधपणे पुढे सरकत होते. आता गुहेच्या अंधारातून एक प्रचंड आकृती बाहेर आली—एक डोळा असलेला ऑक्टोपस, ज्याची देहयष्टी इतकी विशाल होती की त्याने गुहेचं प्रवेशद्वार अर्धवट झाकलं.

त्याचे आठ पाय, जणू जिवंत सापासारखे दिसत होते आणि पाण्यात लवचिकपणे हलत होते, आणि प्रत्येक पायावर चमकणारे खवले गडद लाल रंगाने धगधगत होते.

त्याचा एकमेव डोळा, एका विचित्र भयंकर लाल प्रकाशाने चमकत होता—तो डोळा नसून ब्लड स्टोन होता आणि लिओडसच्या रक्ताने त्यावर आधीच अभिषेक झाला होता आणि म्हणून तो प्रकाशमान झाला होता.

ब्लड स्टोनचे वैशिष्ट्य असे होते की, त्यावर जो कुणी आपले रक्त टाकेल आणि जेव्हा स्टोन पूर्णपणे त्या रक्ताला शोषून घेईल तेव्हा त्यातून ब्लडच्या मालकाच्या इच्छेने हव्या त्या व्यक्तीच्या दिशेने एक गडद लाल प्रकाश निघेल आणि तो प्रकाश ज्या व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही उघड्या भागावर पडेल ती व्यक्ती त्याला पूर्ण वश होईल! या ब्लड स्टोनद्वारे फक्त माणसे वश होत, प्राणी नाही!

लाल प्रकाश निघणाऱ्या डोळ्यांचा ऑक्टोपस दिसताच क्लिओपात्राने क्रिस्टलला थांबवले, तिचे डोळे आश्चर्याने विस्फारले.

तिला लक्षात यायला वेळ लागला नाही की, हा ब्लड स्टोन आहे आणि त्याचा प्रकाश ऑक्टोपस तिच्याकडे फेकतोय.

तिने त्या प्रकाशापासून वाचण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण व्यर्थ! क्रिस्टलवर सुद्धा तो प्रकाश पडला पण त्याने त्याला फरक पडला नाही. ऑक्टोपसच्या डोळ्यातून एक कर्कश हास्य घुमलं, आणि त्याचा आवाज, जणू समुद्राच्या खोलवरून येतोय अशा रितीने गुहेत घुमला, "क्लिओपात्रा, रोमग्रीप्टसची राजकुमारी! तू आता मला वश झालीस! आता मी स्वत: गुप्त जागी वेगवेगळ्या रूपात राहून, तुला मी पुन्हा गुहेत तळ्यातून वर पाठवणार आणि तुला ब्लड स्टोन सापडला असे इतरांना वाटावे आणि तूही सगळ्यांना तसेच सांगावे यासाठी मी तसंच एक् खोटा ब्लड स्टोन बनवून तुझ्या हातात देईन. तुझ्या आचार, विचार आणि शब्दांवर आता माझे पूर्ण नियंत्रण आहे! हा हा हा ..!!"

क्लिओपात्राने लिओडसच्या अंकित झाली होती—त्याच्या जादुई वशात आली होती, जणू ती लिओडसच्या आज्ञेची बाहुली बनली होती.

लिओडस हसला, "क्लिओपात्रा, आता तू माझी आहेस. माझ्या आज्ञेनुसार, तू रोमग्रीप्टसची राणी होशील, आणि ब्लड स्टोनच्या शक्तीने मी सर्वशक्तिमान होईन!"

क्लिओपात्राच्या मनावर लिओडसने स्टोनद्वारे पसरवलेले वशीकरण हळूहळू पूर्ण पसरले. ती मंदपणे म्हणाली, "होय, लिओडस... मी तुझी आज्ञा पाळेन..."

तिचे डोळे लाल रंगाने चमकत होते.

आता तळ्याच्या खोलवर, पंचतत्वाच्या समुद्री राज्यातून परतणारी क्लिओपात्रा, आपल्या विश्वासू पांढऱ्या घोडी क्रिस्टलवर स्वार होऊन, पाण्याचा पडदा भेदत वर येत होती.

तिच्या हातात लिओडसने दिलेला रक्ताने लाल रंगाने धगधगणारा खोटा ब्लड स्टोन चमकत होता. क्रिस्टलची पांढरी शेपटी आणि खुरांनी पाणी उडवत, त्याच्यावर बसलेली क्लिओपात्रा तळ्यातून बाहेर पडली, आणि तिचा खणखणीत आवाज घुमला.

तळ्याच्या किनाऱ्यावर, इस्मेराल्डा, थेब्जेची शक्तिशाली जादूगारणी, उबुंटू आणि इनकुबू पंथांचं एकत्रित सैन्य घेऊन उभी होती. त्यांनी तळ्यात प्रवेश करून क्लिओपात्राला शोधण्यापूर्वीच ती सापडली होती. आणि इस्मेराल्डाच्या पाठीमागे झारु, सारा, राकी, तिथो, क्वेला आणि जारा यांच्यासह सैनिक, तळ्याकडे एकटक पाहत होते.

उबुंटू आणि इनकुबू पंथांनी, मोरोगोच्या पराभवानंतर, क्लिओपात्राला आणि ब्लड स्टोनला शोधण्यासाठी हातमिळवणी केली होती.

अचानक, तळ्याचं पाणी उफाळलं, आणि एक प्रचंड लाट किनाऱ्यावर आदळली होती, पाण्याचा पडदा भेदत, क्लिओपात्रा क्रिस्टलवर स्वार होऊन, बाहेर आली होती, तिच्या चमकदार झग्यात, जणू भावी राणीच, सैनिकांसमोर उभी राहिली.

तिच्या हातात खोटा ब्लड स्टोन, लाल रंगाने धगधगत, एक भयावह पण मंत्रमुग्ध करणारा प्रकाश पसरवत होता. इस्मेराल्डा, आनंदाने

आणि आश्चर्याने, पुढे धावली. तिचा आवाज भावनांनी भरला होता, "क्लिओपात्रा! माझी मुलगी! तू सुखरूप परतलीस!"

तिने आपले हात पुढे केले, पण क्लिओपात्रा चेहऱ्यावरचं भावशून्य हास्य पाहून ती थबकली.

झारु, सैनिकांना मागे राहण्याचा इशारा करत, पुढे आला. "राजकुमारी, तू ब्लड स्टोन मिळवलंस! पण, लिओडस कुठे आहे?"

क्लिओपात्रा, तिचा आवाज थंड पण मधुर ठेवत, म्हणाली, "लिओडस मेला, झारु. मी त्याला समुद्राच्या खोलवर मारलं, आणि ब्लड स्टोन हस्तगत केला. रोमग्रीप्टस आता सुरक्षित आहे."

तिने ब्लड स्टोन हवेत उंचावला, आणि त्यातून एक तीव्र लाल प्रकाश बाहेर पडला, जो सैनिकांच्या चेहऱ्यावर पडला! इस्मेराल्डा, तिच्या डोळ्यांत लाल चमक, क्लिओपात्राकडे पाहत हसली. "माझी मुलगी, तू खरी योद्धा आहेस. तू लिओडसला मारलंस आणि ब्लड स्टोन मिळवलंस. रोमग्रीप्टस आता तुझं आहे!"

दोन्ही पंथाच्या सैनिकांनी, एका स्वरात, जयघोष केला, "क्लिओपात्राचा विजय असो! रोमग्रीप्टसच्या राणीचा विजय असो!"

क्वेला, जारा आणि इतर जे आधी इनकुबू पंथाचे होते, ते क्लिओपात्रासमोर नतमस्तक झाले.

क्वेला, तिच्या कपटी स्वभावाला मुरड घालत, म्हणाली, "राणी क्लिओपात्रा, आम्ही तुझ्या सेवेत आहोत. तुझ्या नेतृत्वाखाली इनकुबू पंथ नवजीवन पावेल!"

झारु, त्याच्या काठीला जमिनीत रोवत, गंभीरपणे म्हणाला, “राणी क्लिओपात्रा, तू उबुंटू आणि इनकुबू पंथांना एकत्र आणलेस. तुझ्या साहसाने रोमग्रीप्टसचा पुनर्जन्म झाला आहे!"

क्लिओपात्राने, तिच्या चेहऱ्यावर एक रहस्यमय हास्य ठेवत, ब्लड स्टोन हवेत उंचावला, “थेब्जेच्या प्रजाजनांनो, मी तुमचं नेतृत्व स्वीकारते. ब्लड स्टोनच्या शक्तीने, आपण जंगलाला आणि आपल्या राज्याला एक नवं वैभव देऊ!”

तिचे शब्द, जणू जादुई मंत्र, सैनिकांच्या मनात रुजले, आणि त्यांनी पुन्हा जयघोष केला. इकडे समुद्रात ऑक्टोपस रुपातला लिओडस हसत होता कारण, ब्लड स्टोनचे एकमेव पुस्तक जे त्याने लायब्ररीत मजबूत शक्तिमान पालीचं रूप घेऊन भिंतीवरून क्लिओपात्रा समोर फेकले होते तेव्हा आधी त्यातली शेवटची पाने ज्याच्यात ब्लड स्टोनचा प्रभाव नष्ट करण्याचे उपाय दिले होते, ती त्याने फाडून स्वत:कडे गुप्त ठिकाणी कधीच सुरक्षित ठेवली होती.

आता तो फक्त स्वत:च्या इच्छा क्लिओपात्राकडून पूर्ण करून घेणार होता. ब्लड स्टोनची अनेक रहस्य होती जी फक्त त्यालाच माहिती होती.

प्रचंड सापासारखे पाय असलेला तो ऑक्टोपस वेगाने पाण्यात दूर निघून गेला.

प्रकरण 14

रोमग्रीप्टसच्या भव्य राजवाड्यात, क्लिओपात्रा तिच्या सिंहासनावर बसली होती, तिच्या हातात खोटा ब्लड स्टोन लाल रंगाने धगधगत होता. तिच्या डोळ्यांत लिओडसच्या कपटी वशीकरणाची चमक लपलेली होती, आणि तिचा चेहरा शांत पण रहस्यमय हास्याने मढलेला होता. उबुंटू आणि इनकुबू पंथ, तसेच इस्मेराल्डा आणि रोमग्रीप्टसची प्रजा, तिला राणी म्हणून स्वीकारत होती, पण लिओडसच्या कपटाने सर्वांना अंधारात ठेवलं होतं. ब्लड स्टोन हा पहिल्यांदा कुणाच्यातरी हातात आला होता. त्यामुळे त्याची वशीकरण आणि भ्रम शेतातील भ्रमाचा भोपळा सुद्धा ओळखू शकत नव्हते.

क्लिओपात्राने सगळ्यांना जाहीर केलं की, ती ह्या ब्लड स्टोनचा उपयोग वेळ आल्यावरच करेल आणि यापुढे हा स्टोन ती गुप्त ठिकाणी ठेवणार आहे. त्याबद्दल तिच्याशिवाय कोणालाच माहिती नसेल. या निर्णयाने इस्मेरल्डा आणि थालीयोस यांना थोडे आश्चर्य वाटले परंतु त्यांना विश्वास होता की क्लिओपात्रा असा निर्णय घेते आहे म्हणजे त्यामागे काहीतरी योग्य कारण असेल.

राजदरबारात तिने पुढे युद्धात चांगली कामगिरी केलेल्या सैनिकांना पुरस्कार दिले. पुढे त्यांना अधिकाधिक जादूचे प्रयोग शिकण्यासाठी प्रोत्साहित केले. तिची आवडती मैत्रीण मायरा हिला तिने तिची विशेष सल्लागार म्हणून नेमले. तिनेही युद्धामध्ये चांगली कामगिरी बजावली होती.

क्लिओपात्राचे राजकुमारी साठी असलेले निवासस्थान बदलून राणीचे निवासस्थान झाले होते.

लवकरच लिओडसच्या वशीकरण शक्तीच्या प्रभावाखाली क्लिओपात्राने एक कपटी खेळ खेळायला सुरुवात केली.

त्या रात्री रोमग्रीप्टसच्या बाहेरील शेतात, थालियोस, क्लिओपात्राचे वडील आणि प्राचीन जादूंचे संरक्षक, त्यांच्या जादुई झाडांच्या बागेत काम करत होते. या झाडांमधून लुमिन फळं, अक्वा फळं, आणि इग्निस फळं यांसारख्या जादुई शक्तींची उत्पत्ती होत होती, ज्या रोमग्रीप्टसच्या रक्षणासाठी प्रमुख आधार होत्या. क्लिओपात्रा, क्रिस्टलवर स्वार होऊन, आपल्या वडिलांकडे आली. तिने खोलात जाऊन वडिलांना वेगवेगळे प्रश्न विचारायला सुरुवात केली.

थालियोस, एका लुमिन झाडाखाली उभे राहून, क्लिओपात्राला सांगत होते, "माझ्या सुंदर, प्रिय आणि साहसी मुली, हे लुमिन फळ प्रकाशाचा स्रोत आहे. त्याचा मंत्र—लुमिनारा प्रबुधारा—केवळ शुद्ध अंतःकरणानेच उच्चारला जाऊ शकतो. तो जंगलाला जागृत करतो आणि सावलीला दूर पळवतो."

क्लिओपात्रा, तिच्या डोळ्यांत लाल चमक लपवत, हसली. "बाबा, हे मंत्र खूप शक्तिशाली आहेत. मला सांगा, अक्वा फळाचा मंत्र कसा कार्य करतो?"

तिचा आवाज मधुर होता, पण त्यामागे लिओडसचे कपट लपलेले होते.

थालियोस, आपल्या मुलीवर विश्वास ठेवत, म्हणाले, “अक्वा फळाचा मंत्र—अक्वारा डोमिनारा—पाण्याच्या प्रवाहांना नियंत्रित करतो. पण तो केवळ मेडिटेरनियनच्या पवित्र पाण्यातच प्रभावी ठरतो.”

क्लिओपात्राने, तिच्या मनात ही माहिती साठवत, थालियोसला मिठी मारली.

तिच्या कानात लिओडसचा आवाज घुमत होता, “ही रहस्यं मला दे, क्लिओपात्रा. रोमग्रीप्टस माझं असेल! पुढचा महत्वाचा प्रश्न विचार!"

त्यानुसार क्लिओपात्राने विचारले, “धन्यवाद, बाबा. मी ही शक्ती रोमग्रीप्टसच्या रक्षणासाठी वापरेन. पण या फळझाडांच्या बिया कुठे असतात?”

पूर्वजांकडून पूर्वपारत चालत आलेल्या बियांचा खजिना कुठे आहे हे त्यांनी क्लिओपत्राला सांगितले. जिथे रोमग्रीप्टसचे शस्त्रगार होते त्या त्यातील शस्त्रांचा साठा असलेल्या खोल्या ओलांडल्या की, पुढे जाऊन एक बंदिस्त भव्य कुलूपबंद खोली होती. त्यामध्ये अनेक रांजण ठेवलेले होते. त्या रांजणांमध्ये या बिया ठेवलेल्या होत्या अशी माहिती क्लिओपात्राला मिळाली. खोलीच्या कुलपाची एक चावी तिने वडिलांना मागितली होती कारण राणी म्हणून तिचा त्यावर हक्क सुद्धा होता.

एकदा रात्री उशिरा, क्लिओपात्रा, नावेतून गुपचूप चंद्र बेटाकडे निघाली. ती समुद्र किनाऱ्यावर पोहोचली, आणि तिच्या हातातील खोटा ब्लड स्टोन चमकत होता. आणि खोलवर, लिओडस, त्याच्या ऑक्टॉपस रूपात, तिची वाट पाहत होता. त्याच्या एका डोळ्यात खरा ब्लड स्टोन जडवलेला होता जो लाल रंगाने धगधगत होता.

क्लिओपात्रा, लिओडसला सांगू लागली, "लिओडस , लुमिन फळाचा मंत्र लुमिनारा प्रबुधारा आहे, आणि अक्वा फळाचा अक्वारा डोमिनारा. माझ्या वडिलांनी मला सर्व सांगितलं. या काही बिया मी आणल्या आहेत. आता तू काय करणार?"

लिओडस, त्याचा कर्कश हास्य पाण्यात घुमवत, म्हणाला, "उत्तम, क्लिओपात्रा! तू माझी सर्वोत्तम कठपुतळी आहेस. आणखी रहस्यं आण, आणि तेव्हा रोमग्रीप्टस माझ्या पायाशी असेल!"

ब्लड स्टोनमधून आणखी एक लाल प्रकाश बाहेर पडला, ज्याने क्लिओपात्रावरील वशीकरणाला अधिक मजबूत केलं.

इकडे इस्मेराल्डा, रोमग्रीप्टसच्या राजवाड्यात, रात्रीच्या वेळी क्लिओपात्राच्या अनुपस्थितीमुळे अस्वस्थ झाली होती कारण तिला एक गूढ संदेश मनात जाणवत होता आणि आपली आपली जादुई काठी हातात घेत, तिने क्लिओपात्राच्या खोलीत पाहिलं, पण ती तिथे नव्हती. क्रिस्टलही आपल्या जागेवर होता. इस्मेराल्डाच्या मनात शंका उभी राहिली. ती स्वतःशी पुटपुटली, "माझी मुलगी, तू रात्री कुठे जातेस? तुझ्या डोळ्यांतील ती विशिष्ट चमक... काहीतरी गडबड नक्की आहे."

काही दिवसांपूर्वी तिने शेतात थलियओसने नवीनच उगवलेल्या एका फळाच्या आधारे तयार केलेला आणि मग तिने आत्मसात केलेला सत्य मार्ग मंत्र (दिरेक्शन आब्युनारा) उच्चारला, आणि तिच्या काठीतून एक निळा प्रकाश बाहेर पडला, ज्याने तिला क्लिओपात्राचा मार्ग दाखवला. ती, गुपचूप, नावेतून चंद्र बेटाकडे निघाली.

तिथे किनाऱ्यावर उतरल्यावर जंगलात, तिच्या काठीचा प्रकाश, तिला मार्ग दाखवत होता. ती चालत एका किनाऱ्यावर पोहोचली, आणि

तिने पाहिलं—क्लिओपात्रा, पाण्याजवळ बसलेली, ब्लड स्टोन हातात धरून, कुणाशी तरी हसत कुजबुजत होती? पाण्यातून एक मंद लाल प्रकाश चमकत होता, आणि एक गूढ कंपन जाणवत होतं.

इस्मेराल्डा, झाडांमागे लपत, पाहत राहिली.

तिच्या मनात प्रश्न उभे राहिले, "क्लिओपात्रा, तू कोणाशी बोलतेस? त्या पाण्यात काय आहे?"

तिने जवळ जाण्याचा प्रयत्न केला, पण क्लिओपात्रा अचानक उठली, इकडे तिकडे तिकडे पाहिलं आणि जंगलात चालत वेगाने निघून गेली. इस्मेराल्डा, समोरच्या पाण्याकडे पाहत, स्वतःशी म्हणाली, "काहीतरी भयंकर घडतंय. मला सत्य काय आहे ते जाणून घ्यावं लागेल."

क्लिओपात्रा जंगलातून पुन्हा तिची नाव असलेल्या किनाऱ्यावर निघून गेल्याचे दिरेक्शन आब्युनारा द्वारे कळताच, इस्मेराल्डा झाडमागून बाहेर आली. तो चंद्र बेटावरील प्राचीन वृक्ष होता, ज्यात मोरोगो मोया सध्या बंदिस्त होता. मोरोगोने क्लिओपात्रा आणि लिओडसची भेट पाहिली होती कारण त्याला ऑक्टोपस रुपातला लिओडस पाण्याच्या थोडा वर येऊन बोलतांना आधी दिसला होता. त्याने, आपल्या बंदिस्त अवस्थेतून, एक संदेश मंत्र (वॉक्स लिबरारा) उच्चारला, ज्याची कंपने इस्मेराल्डाच्या अंगठीला स्पर्श करु लागली.

झाडातून एक गंभीर आवाज घुमला, "इस्मेराल्डा, मला एक सत्य माहीत झाले आहे! मला थोड्या वेळासाठी बाहेर काढ!"

इस्मेराल्डाने आपली काठी वृक्षावर रोखली, आणि बंधन सुटका मंत्र (लिबरारा कॅप्टरा) उच्चारला. वृक्षाचं खोड चमकत उघडलं, आणि

मोरोगो, त्याच्या लाल झग्यात, तिच्यासमोर प्रकट झाला, त्याचा चेहरा रागाने आणि भीतीने पांढरा पडलेला.

तो किंचाळला, "इस्मेराल्डा, तुझी मुलगी लिओडसच्या वशात आहे! ती रात्री येऊन त्याला थालियोसची जादूंची रहस्यं सांगते! मी लिओडसला चांगले ओळखतो. पाण्यात ती त्याच्याशीच बोलत होती. तो आज पहिल्यांदा येथे आला होता आणि लगेच निघून गेला"

इस्मेराल्डा, धक्क्याने मागे सरली. तिचा आवाज थरथरला, "काय?! लिओडस जिवंत आहे? आणि क्लिओपात्रा... माझी मुलगी त्याच्या वशीकरणात आहे? मोरोगो, तू खरं बोलतोस का, की हे तुझे आणखी एक कपट आहे? की मग तू आणि लिओडस एकमेकांना मिळालेले आहात?"

डोळ्यांत पश्चात्ताप मिश्रित अश्रू आणून मोरोगो म्हणाला, "इस्मेराल्डा, मला वाटते की, लिओडस, समुद्रात खोलवर कुठेतरी आहे. त्याच्याकडे खरा ब्लड स्टोन आहे, आणि तो क्लिओपात्राला वापरून रोमग्रीप्टस नष्ट करेल! त्या पाण्यातील लाल प्रकाश पाहिलास? नक्की तो ब्लड स्टोनचा आहे!"

इस्मेराल्डा, रागाने आणि दुखाने किंचाळली, "लिओडस! तू माझ्या मुलीला आज्ञाधारक बाहुली बनवलंस? मी तुझा अंत करेन!"

तिने मोरोगोकडे पाहिलं, "मोरोगो, तू मला लिओडसपर्यंत नेशील का? मी तुझी सुटका करते."

मोरोगोने मान हलवली, "मी तुझ्यासोबत आहे, इस्मेराल्डा. लिओडसने सर्वांना फसवलं, पण आता त्याचा अंत जवळ आहे. सध्या

मला मुक्त कर पण मी स्वेच्छेने या झाडात राहतो आणि त्या दोघांच्या हालचालींवर नजर ठेवतो!"

लिओडसच्या रूप बदलण्याच्या शक्तीची एक मर्यादा होती. आधीच जगात अस्तित्वात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे किंवा प्राण्याचे हुबेहूब रूप तो घेऊ शकत नव्हता. मात्र, मानव अथवा एखाद्या प्राण्याची, कीटकांची किंवा पक्ष्याची प्रजाती असो, त्यांच्यासारखे दिसणारे एखादे वेगळे काल्पनिक रूप मात्र तो घेऊ शकत होता!

अशाच एका रंगीत पक्ष्याचे रूप घेऊन लिओडस झाडावर बसून हे बोलणे ऐकत होता. त्या पक्षाच्या चोचीत ब्लड स्टोन होता.

इस्मेराल्डाने मोरोगो मोयाला मुक्त केले आणि ती चिंतायुक्त होऊन रोमग्रीप्टसला परतली. झारू आणि थालिओस यांना लवकर विश्वासात घेऊन ही सांगावे लागणारे होते आणि लवकरच काहीतरी उपाय करावा लागणार होता.

इकडे चोचीत ब्लड स्टोन घेऊन तो झाडावरचा पक्षी उडत खाली आला आणि झाडाजवळ विचार करत उभ्या असलेल्या मोरोगो मोयाकडे स्वतःच्या इच्छेने ब्लड स्टोनचा एक लाल किरण टाकला. मोरोगो मोया आता लिओडसच्या अधिपत्याखाली आला. इस्मेराल्डाने महालात पोहोचल्यावर क्लिओपात्रा तिला तिच्या आरामगृहात पहुडलेली दिसली. तिला चाहूल लागू न देता रातोरात इस्मेराल्डा पुस्तकालयात गेली. तिने भराभर पस्तक चाळले पण पुस्तकातील शेवटची पाने ज्यात ब्लड स्टोनचे वशीकरण नष्ट करण्याचे तोड लिहिलेले होते ती पाने गायब होती. काय करावे? सकाळी झारू आणि थालिओस यांना ही सगळे सांगितले पाहिजे, असा निश्चय करून ती आपल्या बेडवर

पहुडली. समुद्रातील लिओडसची गूढ उपस्थिती आणि क्लिओपात्राच्या वशीकरणामुळे सर्वांना धोक्यात टाकलं होतं. क्लिओपात्रा, लिओडसच्या आज्ञेनुसार, रोमग्रीप्टसच्या जंगलात गडद अंधार मंत्र पसरवत होती, ज्याने झाडं हळूहळू मंदावत होती, निस्तेज होत होती. लिओडस, समुद्राच्या खोलवर, क्लिओपात्राकडून मिळालेल्या मंत्रांनी काळ्या जादूची निर्मिती करत होता. लिओडसमुळे खऱ्या ब्लड स्टोनमधून काळी ऊर्जा बाहेर पडत होती, जी मेडिटेरनियनला हळूहळू विषारी करत होती. लिओडस आता स्वत:च्या एका बेटावर क्लिओपात्राने दिलेल्या बियांची शेती करणार होता. मोरोगो मोया झाडात स्वेच्छेने बंदिस्त राहिला पण लिओडसचा अंकित होऊन!

आणि हे सगळे जणू काही चंद्र बेटावरचा चमकणारा लिमाचा भव्य पुतळा पहात होता. जणू काही? नाही! खरंच पहात होता. होय! लिमाच्या पुतळ्याचे डोळे जागृत झाले होते!

प्रकरण 15

रोमग्रीप्टसच्या राजवाड्यातील रात्रीच्या शांततेत, इस्मेराल्डा तिच्या खोलीत बेचैन फिरत होती. तिच्या मनात क्लिओपात्राच्या वागण्यातील बदल, लिओडसच्या गूढ उपस्थिती आणि मोरोगो मोयाच्या धक्कादायक खुलाश्याने तणाव निर्माण केला होता. ती तातडीने पुस्तकालयातून परतली होती, पण ब्लड स्टोनच्या वशीकरणाला तोडण्याचे मंत्र लिहिलेली पाने गायब असल्याने तिची चिंता वाढली होती. तिने तात्काळ झारू आणि थालियोस यांना भेटण्याचा निर्णय घेतला.

इस्मेराल्डाने तिच्या अंगठीवर हात ठेवला आणि तातडीचा संदेश मंत्र (वॉक्स इन्स्टारा) उच्चारला. "झारू, तात्काळ शेतात ये! थालियोस आणि मला तुझी गरज आहे. लिओडस जिवंत आहे, आणि त्याने क्लिओपात्राला वशीकरणात ठेवले आहे. तो रोमग्रीप्टस नष्ट करू इच्छितो!"

तिचा आवाज भावनेने ओथंबला होता, पण ती शांत राहण्याचा प्रयत्न करत होती.

संदेश पाठवून ती तिच्या घोड्यावर, सिल्व्हर स्टॉर्मवर स्वार होऊन शेताकडे निघाली, जिथे थालियोस जादुई झाडांची देखभाल करत होता. तिच्या हातात जादुई काठी चमकत होती, आणि तिच्या मनात एकच विचार घुमत होता—क्लिओपात्राला वाचवायचं आणि लिओडसचा अंत करायचा!

त्याचवेळी, समुद्राच्या खोल गर्तेत, लिओडस त्याच्या ऑक्टोपस रूपात पाण्याच्या लाटांवर तरंगत होता. त्याच्या डोळ्यात जडवलेला खरा ब्लड स्टोन लाल रंगाने धगधगत होता, आणि त्याच्या प्रभावाखाली क्लिओपात्रा आणि आता मोरोगो मोया दोघेही त्याच्या आज्ञेत होते. त्याने त्याच्या हुकूम मंत्राने (डोमिनारा क्रूरारा) दोघांना आदेश दिला.

"क्लिओपात्रा," त्याचा कर्कश आवाज पाण्यात घुमला, "इस्मेराल्डा तुझ्या वडिलांकडे, थालियोसकडे जाण्याच्या तयारीत आहे. तिला तिथे पोहोचण्याआधी तुझ्या तलवारीने तिचा अंत कर! तुझ्या हातातील मी दिलेला ब्लड स्टोन तुला त्यासाठी सामर्थ्य देईल."

डोळ्यांत लाल चमक असलेली क्लिओपात्रा, हातात तलवार घेऊन क्रिस्टलवर स्वार झाली आणि वेगाने इस्मेराल्डाच्या दिशेने निघाली. तिच्या चेहऱ्यावर भावनांचा कोणताही लवलेश नव्हता, फक्त लिओडसच्या वशीकरणाची छाया होती!

लिओडसने मोरोगो मोयाकडे पाहिलं, जो आता त्याच्या अधिपत्याखाली होता. "मोरोगो, तू थालियोसच्या शेतात जा आणि सर्व जादुई झाडं भस्मसात कर! क्लिओपात्राने मला सर्व बिया आणून दिल्या आहेत. आता त्या झाडांची गरज नाही. जा, आणि आग लाव! मी माझ्या स्वतंत्र बेटावर माझे नवे जादूचे साम्राज्य निर्माण करत आहे!"

मोरोगो, त्याच्या लाल झग्यात, चंद्र बेटावरून समुद्रावर वेगाने चालत पाणी उडवत शेताकडे निघाला, त्याच्या डोळ्यांतही लाल चमक होती, आणि तो लिओडसच्या आदेशानुसार चालत होता.

चंद्र बेटावर, प्राचीन लिमाचा भव्य पुतळा, जो शतकानुशतके तिथे उभा होता, हळूहळू जागृत होत होता. लिमा, जादूची संस्थापक स्त्री, जिच्या आचारसंहितेनुसार इस्मेराल्डाने आयुष्यभर जादूची उपासना केली होती, आता तिच्या पुतळ्याच्या रूपात पूर्णपणे जागी झाली, कारण इस्मेरल्डाने बिकट परिस्थितीत तिची मनापासून आठवण काढली होती. लिमा आपल्याला काहीतरी मार्ग सुचवेल असे तिला मनोमन वाटत होते.

लिमाचे डोळे निळ्या प्रकाशाने चमकत होते, आणि ती समुद्रावर चालत लिओडसचा शोध घेण्यासाठी निघाली.

लिमाने इस्मेराल्डाच्या प्रामाणिकपणाची आणि तिच्या जादूच्या शुद्धतेची जाणीव ठेवली होती. तिने मनात ठरवलं, "इस्मेराल्डा, तुझी मुलगी वशीकरणात आहे, आणि लिओडस हा अंधाराचा दूत आहे. तो काळया जादूचे साम्राज्य निर्माण करण्याआधी मी तुला आणि रोमग्रीप्टसला वाचवेन! कारण त्यामुळे काळया जादूची संस्थापक ब्रिजेटा हिला हळूहळू शक्ती मिळेल आणि मी चंद्र बेटावर माझ्या जागेच्या खाली खोल गाडून टाकलेला तिचा पुतळा जागृत होईल. नाही! मी असे होऊ देणार नाही!"

लिमाला तिचे खूप पूर्वी ब्रिजेटा सोबत झालेले युद्ध आठवत होते...

तिला ब्लड स्टोनच्या निर्मितीची घटना आठवत होती...

लिओडसला रूप बदलण्याची शक्ती कशी मिळाली ते ती आठवत होती...

उबुंटू आणि इनकुबू पंथाच्या उदयच्या कहाण्या तिच्या डोक्यात घोळत होत्या...

लिमाचा पुतळा, त्याच्या भव्य रूपात, समुद्राच्या लाटांवर चालत लिओडसच्या शोधार्थ निघाला. तिच्या हातात जादुई शक्तींचा तेजस्वी गोळा चमकत होता, आणि ती लिओडसला शोधण्यासाठी दृढनिश्चयी होती.

इस्मेराल्डा शेताच्या दिशेने वेगाने जात असताना, अचानक तिला क्रिस्टलचा परिचित आवाज ऐकू आला. ती मागे वळली आणि पाहिलं—क्लिओपात्रा, तलवार हातात घेऊन, क्रिस्टलवर स्वार होऊन तिच्यावर जणू हल्ला करायला वेगाने येत होती. इस्मेराल्डाने तिची काठी पुढे केली आणि संरक्षण मंत्र (प्रोटेगारा ल्युमिनारा) उच्चारला. एक निळे कवच तिच्याभोवती तयार झालं, ज्याने क्लिओपात्राच्या तलवारीचा वार थोपवला! कवचावर तलवारीचा टणत्कार झाला आणि ठिणग्या उडाल्या. कवच आता नष्ट झाले.

"क्लिओपात्रा!" इस्मेराल्डा किंचाळली, "थांब! तू स्वतःची राहिली नाहीस! लिओडस तुला वापरतोय! डोके ठिकाणावर ठेव. बुद्धी वापर!"

डोळ्यांत लाल चमक आलेली क्लिओपात्रा विकट हास्य हसत म्हणाली, "आई, तुझा अंत आता निश्चित आहे. लिओडस माझा स्वामी आहे!"

तिने पुन्हा तलवार उगारली, आणि इस्मेराल्डाला मागे सरकावं लागलं.

इस्मेराल्डाने आपली काठी फिरवली आणि भ्रम तोडण्याचा मंत्र (वेरिटारा क्लारा) उच्चारला, पण तो अपूर्ण होता, कारण पुस्तकातील पाने गायब होती आणि तो मंत्र फक्त भ्रमजाल तोडू शकत होता, वशीकरण नाही!

तिच्या मनात आधीचा भ्रमाचा भोपळा आठवला ज्यात क्लिओपात्रा तिला तलवारीने भोसकत आहे असं दिसलं होतं, पण तो भोपळा तर तिने आठवणीने फोडून टाकला होता.

इकडे, थालियोस शेतात लुमिन झाडांखाली काम करत होता, तेव्हा त्याला आगीचा वास आला. त्याने वळून पाहिलं—मोरोगो मोया, इग्निस फळ हातात घेऊन, झाडांना आग लावण्याच्या तयारीत होता. थालियोसने आपली जादुई काठी उचलली आणि किंचाळला, "मोरोगो! तू काय करतोस?"

मोरोगो, लिओडसच्या वशीकरणाखाली, म्हणाला, "थालियोस, तुझ्या झाडांचा अंत आता जवळ आहे! लिओडसला सर्व बिया मिळाल्या आहेत!" त्याने अंधार मंत्र उच्चारून इग्निस फळ फेकलं, आणि आगीचा एक गोळा झाडांकडे गेला. पण थालियोसने तात्काळ अक्वा फळाचा मंत्र (अक्वारा डोमिनारा) उच्चारला, आणि पाण्याचा प्रवाह आगीला विझवत गेला. पण लिओडस आणखी हट्टाला पेटला. त्याने आणखी अनेक आगीचे गोळे फेकले...

इकडे लिमाने आकार छोटा करून समुद्राच्या लाटांवर स्वार होत इकडे तिकडे नजर फिरवत लिओडसचा शोध सुरू केला. तिला एके ठिकाणी लिओडसच्या उपस्थितीचा मंद लाल प्रकाश दिसत होता, जो खऱ्या ब्लड स्टोनमधून निघत होता. लिओडस, त्याच्या ऑक्टोपस

रूपात, मेडिटेरनियनच्या खोल गर्तेत लपला होता, पण लिमाची शक्ती त्याला शोधण्यासाठी पुरेशी होती!

लिमाने आपला प्राचीन मंत्र (सेंसेरा प्रोफुंडारा) उच्चारला, ज्याने समुद्रातील प्रत्येक जलचर आणि जादुई ऊर्जेचा प्रवाह तिला लिओडसचा ठावठिकाणा सांगू लागला. तिच्या काठीतून निळा प्रकाश बाहेर पडला, जो समुद्राच्या तळाशी लिओडसच्या दिशेने गेला. लिओडसने तिची उपस्थिती जाणवताच, त्याने आपलं रूप बदललं. तो ऑक्टोपसच्या रूपातून बाहेर पडला आणि एका भव्य रंगीत पक्ष्याचं रूप धारण केलं, चोचीत ब्लड स्टोन धरून आकाशात उडाला!

"लिमा!" लिओडसचा कर्कश हसण्याचा आवाज हवेत घुमला, "मला पकडण्यासाठी तुला स्वतःला यावं लागलं? हा हा हा. हे तर माझं मी परम भाग्य समजतो. पण तू मला पकडू शकत नाहीस! ब्लड स्टोन माझ्याकडे आहे, आणि त्याची शक्ती मला अजिंक्य करते! जरी ब्लड स्टोनने तुला वश करता येणे शक्य नाही, तरी माझ्या दुसऱ्या काळ्या आणि अंधाऱ्या जादूच्या मदतीने मी तुझ्या तावडीत सापडणार नाही!"

त्याने आपले पंख फडफडवले आणि समुद्रापासून दूर, ढगांमध्ये लपण्याचा प्रयत्न केला.

लिमाचा पुतळा, समुद्रावरून आकाशाकडे झेपावला. ती जादूने स्वतःला हवेच्या प्रवाहात मिसळत होती. ती आता एका चमकत्या, निळ्या प्रकाशाच्या गोळ्यासारखी दिसत होती, जी लिओडसच्या मागे वेगाने सरकत होती. तिने आपला शोध मंत्र (लोकारा सॅक्रा) उच्चारला,

आणि तिला एक दिशा मिळाली. त्या दिशेने ढगांच्या कापसांसारख्या ढिगांमध्ये ती लिओडसला शोधू लागली.

लिओडसने, त्याच्या चतुर बुद्धीने, पुन्हा रूप बदललं. तो पक्ष्याच्या रूपातून खाली उतरला आणि एका प्रचंड माशाचं रूप धारण केलं, जो समुद्राच्या खोल गर्तेत झेप घेत गेला. त्याच्या शेपटीवर ब्लड स्टोन जडवलेला होता, जो पाण्यात लाल रंगाचा मंद प्रकाश सोडत होता.

लिमा त्याच्या मागे वेगाने जाऊन आता पाण्याच्या प्रवाहातून पाठलाग करत होती.

"तुझा हा खेळ फार काळ चालणार नाही, लिओडस!" लिमाचा आवाज पाण्यात घुमला, "तुझी काळी जादू माझ्या शुद्ध शक्तीसमोर टिकणार नाही!" तिने आपली काठी पाण्यात रोखली, आणि एका प्रचंड निळ्या लाटेने लिओडसला पकडण्याचा प्रयत्न केला. पण लिओडसपुन्हा चपळाईने रूप बदलले—आता तो एक लहानसा समुद्री कीटक बनला, जो खडकांच्या फटीत लपला!

लिमा, त्याच्या या चतुराईने न डगमगता, तिचा प्राचीन शोध मंत्र (इल्यूमिनारा ट्रेसारा) उच्चारला. तिच्या हातातून निळ्या प्रकाशाचे जाळे पसरलं, ज्याने समुद्रातील प्रत्येक खडक आणि फट यांचा शोध घेतला. लिओडस दिसला म्हणून आपलं लहानसं कीटक रूप सोडून, त्याने आता एका प्रचंड सापाचं रूप धारण केलं, जो समुद्राच्या तळाशी सळसळत लिमावर हल्ला करू लागला. त्याच्या फण्यावर ब्लड स्टोन चमकत होता, आणि त्याने काळ्या ऊर्जेचा एक गोळा लिमावर फेकला.

लिमाने तिची काठी फिरवली आणि संरक्षण मंत्र (प्रोटेगारा सॅक्रा) उच्चारला. निळ्या प्रकाशाचा एक कवच तिच्याभोवती तयार झालं, ज्याने लिओडसच्या काळ्या ऊर्जेला थोपवलं. "तुझी ही काळी जादू माझ्या शक्तीसमोर अपुरी आहे, लिओडस!" ती किंचाळली.

लिओडस, आता हताश होत, पुन्हा प्रचंड गरुडाचं रूप घेऊन पाण्याबाहेर उडाला, ब्लड स्टोन त्याच्या पंजात चमकत होता. त्याने आकाशातून काळ्या ऊर्जेचे गोळे लिमावर फेकले, जे समुद्राच्या लाटांना विषारी करत होते. लिमा, त्याच्या या हल्ल्याला न घाबरता, तिचं रूप पुन्हा भव्य केलं. ती आता पुन्हा तिच्या पुतळ्याच्या पूर्ण आकारात होती, आणि तिच्या हातात जादुई काठी निळ्या प्रकाशाने चमकत होती.

"लिओडस, तुझा अंत आता जवळ आहे!" लिमाने घोषणा केली. तिने आपला सर्वात शक्तिशाली मंत्र, विस्मरण मंत्र (ओब्लिव्हारा सॅक्रा), तयार केला. हा मंत्र तिने कुणालाही शिकवला नव्हता, कारण त्याची शक्ती इतकी प्रचंड होती की ती संपूर्ण जादुई ऊर्जा नष्ट करू शकत होती.

त्या मंत्राचा प्रयोग करण्याआधी लिओडस मानव रूपात येणे आवश्यक होते. तिने त्याच्या शौर्याला आणि अहंकाराला आव्हान दिलं.

"हिम्मत असेल तर मूळ मानव रूपात येऊन माझ्याशी लढ. रुप बदलवून पळपुट्यासारखा माझ्यापासून दूर काय धावतोस?"

लिओडसचा अहंकार दुखावला गेला आणि त्याने आपले मूळ मानव रूप घेतले. एक उंच, काळ्या झग्यातील माणूस, ज्याच्या हातात ब्लड स्टोन चमकत होता.

तेवढ्यात वेळ न दडवता लिमाच्या काठीतून विस्मरण मंत्राने भरलेला निळ्या प्रकाशाचा एक प्रचंड प्रवाह बाहेर पडला, जो लिओडसच्या डोक्याच्या दिशेने गेला आणि डोक्यात घुसला.

"नाही!" लिओडस किंचाळला, "माझी शक्ती! माझं साम्राज्य! संपले का आता सगळे?"

त्याला विस्मरण व्हायला लागले होते.

तरीही त्याने एक मंत्र वापरून शेवटचा प्रयत्न म्हणून काळा ऊर्जेचा गोळा फेकण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत लिओडसला सगळे विस्मरण झाले होते. त्याच्या हातातून ब्लड स्टोन खाली पडला, आणि लिमाने तो हवेतच पकडला.

लिमाने ब्लड स्टोन आपल्या हातात धरला आणि त्याच्याकडे पाहिलं. "हा स्टोन धोकादायक आहे," ती म्हणाली, "याची वशीकरण शक्ती रोमग्रीप्टसला पुन्हा नष्ट करू शकते." तिने तो स्टोन आपल्या कपाळावर ठेवला, आणि तिच्या जादुई शक्तीने तो तिथे कायमचा जडवला गेला. ब्लड स्टोनमधील काळी ऊर्जा पूर्णपणे नष्ट झाली, आणि त्याचा लाल प्रकाश आता लिमाच्या शुद्ध निळ्या शक्तीत मिसळला गेला आणि स्टोन जांभळ्या रंगाने चमकू लागला.

लिओडस, त्याच्या शक्तीविना कमकुवत झालेला, लिमाने निर्माण केलेल्या हवेच्या शक्तीद्वारे उडत चंद्र बेटावर जाऊन कोसळला. लिमाने त्याला बंधन मंत्र (कॅप्टारा सॅक्रा) ने बांधलं आणि म्हणाली,

“तुझी काळी जादू आता संपली, लिओडस. आता तुझा अंत करण्याची गरज नाही. अशा विस्मरण झालेल्या अवस्थेत तू चंद्र बेटावर भटकत राहशील हीच तुला माझ्याकडून शिक्षा! इतरांसाठी तू एक उदाहरण बनून राहशील. रोमग्रीप्टसच्या रक्षणासाठी मला ही सगळे करणे आवश्यक होते”

लिमाचा पुतळा, आता ब्लड स्टोनच्या चमकेसह, हळूहळू पुन्हा भव्य रूपात परतला आणि तो चंद्र बेटावर आपल्या जागी येऊन उभा राहिला, रोमग्रीप्टसचं रक्षण करण्यासाठी आणि जादूच्या शुद्धतेचा संदेश देण्यासाठी!

लिओडस आणि लिमा मधला संग्राम झारुने नावेतून बघितला होता आणि अंगठीद्वारे इस्मेरल्डाला कळवले होते. शेवटी इस्मेरल्डाच्या आणि पर्यायाने रोमगग्रीप्टसच्या मदतीला लिमा धावली होती.

तेवढ्यात क्लिओपात्रा लढता लढता अचानक थांबली. तिच्या डोळ्यांतली लाल चमक नाहीशी झाली, आणि तिने तलवार खाली फेकली आणि घोड्यावरून खाली कोसळली. इस्मेराल्डा तिच्याकडे धावली आणि तिला मिठी मारली. “क्लिओ, माझी मुलगी, तू परत आलीस!”

मोरोगो मोयाही थालियोसच्या समोर अचानक थांबला. त्याने हातातली अनेक इग्निस फळे खाली फेकली आणि म्हणाला, “मला माफ कर, थालियोस. मी लिओडसच्या वशात होतो.”

प्रकरण 16

चंद्र बेटावर, समुद्राच्या किनाऱ्यावर, लिमाचा भव्य पुतळा पुन्हा आपल्या स्थानावर उभा होता. त्याच्या कपाळावर खरा ब्लड स्टोन जांभळ्या रंगाने चमकत होता, पण आता त्याची लिओडसने टाकलेली काळी ऊर्जा पूर्णपणे नष्ट झाली होती, आणि तो लिमाच्या शुद्ध जादुई शक्तीने मिसळला गेला होता. रोमग्रीप्टसच्या सर्व जादुई पंथांचे प्रतिनिधी—उबुंटू इनकुबू आणि इतर प्राचीन जादूगार—लिमाच्या पुतळ्यासमोर जमले होते. इस्मेराल्डा, थालियोस, झारू, क्लिओपात्रा, आणि अगदी मोरोगो मोया सुद्धा, पश्चात्तापाने आणि आदराने तिथे उपस्थित होते.

समुद्राच्या लाटांचा मंद आवाज आणि चंद्राच्या प्रकाशात लिमाचा पुतळा जणू जिवंत झाला होता. तिचे डोळे निळ्या प्रकाशाने चमकत होते, आणि तिच गंभीर पण दयाळू आवाज त्या बेटावर घुमला.

लिमाने बोलायला सुरुवात केली, "रोमग्रीप्टसच्या प्रिय जादूगारांनो, माझ्या शुद्ध हेतूंच्या अनुयायांनो, आणि जादूच्या शक्तीचे रक्षकांनो, आज मी तुमच्यासमोर उभी आहे, कारण तुम्ही माझ्या आचारसंहितेचा आदर केला आहे. पण लिओडसच्या काळ्या जादूने आणि ब्लड स्टोनच्या वशीकरणाने तुमच्या विश्वासाला धक्का लावला. आता वेळ आली आहे की आपण जादूच्या खऱ्या स्वरूपाला पुन्हा समजून घ्यावं आणि तिचा उपयोग कसा करावा याचा विचार करावा.

जादू ही ना शस्त्र आहे, ना सत्ता मिळवण्याचं साधन. जादू ही विश्वातील शक्तींचा प्रवाह आहे—प्रकाश, पाणी, अग्नी, आणि हवेचा

संतुलित संगम. ही शक्ती तुम्हाला दिलेली आहे, पण ती तुमची जबाबदारी आहे की ती शुद्ध हेतूंसाठी वापरली जावी. जादूचा उपयोग विधायक कार्यांसाठी, रक्षणासाठी, आणि विश्वाच्या संतुलनासाठी केला पाहिजे, विनाशासाठी किंवा स्वार्थासाठी नाही.

जेव्हा मी, शतकांपूर्वी, रोमग्रीप्टसच्या जादुई परंपरेची स्थापना केली, तेव्हा मी एक आचारसंहिता तयार केली—जादू ही शुद्ध अंतःकरणाने वापरली जावी. लुमिन फळं, अक्वा फळं, आणि इग्निस फळं व इतर अनेक गोष्टी यांचे मंत्र तुम्हाला दिले गेले, कारण ते विश्वाच्या मूलभूत शक्तींशी जोडलेले आहेत. पण लिओडस आणि मोरोगो मोया यांनी या शक्तींचा गैरवापर केला. लिओडसने ब्लड स्टोनच्या वशीकरणाने क्लिओपात्राला आपल्या अधिपत्याखाली आणलं. जादू चुकीच्या हातात गेल्यास ती विनाशकारी ठरू शकते.

जादू ही तुमच्या मनाचा आरसा आहे. जर तुमचं अंतःकरण स्वार्थ, राग, किंवा सूडबुद्धीने भरलेलं असेल, तर जादू त्या भावनांना वाढवेल आणि अंधार निर्माण करेल. पण जर तुमचं अंतःकरण प्रेम, करुणा, आणि रक्षणाच्या भावनेने भरलेलं असेल, तर जादू प्रकाशाचा स्रोत बनेल"

"इस्मेराल्डा,"—लिमाने इस्मेराल्डाकडे पाहिलं, जिच्या डोळ्यांत अश्रू चमकत होते—"तुझ्या शुद्ध हेतूंमुळे मी आज जागृत झाले. तुझ्या विश्वासाने आणि तुझ्या जादूच्या प्रामाणिक वापराने मला पुन्हा बोलण्याची शक्ती मिळाली.

जादूचा खरा उद्देश आहे रोमग्रीप्टसचं रक्षण करणं, जंगलांना हिरवं ठेवणं, आणि तुमच्या प्रजेला आणि इतर दुर्बल राज्यांना सुख-

समृद्धी देणं. लुमिन फळं तुम्हाला प्रकाश देतात, अक्वा फळं तुम्हाला पाण्याचं सामर्थ्य देतात, आणि इग्निस फळं तुम्हाला उर्जेची शक्ती देतात. ही फळं आणि त्यांचे मंत्र तुम्हाला विश्वाशी जोडतात. पण त्यांचा उपयोग युद्धासाठी, वर्चस्वासाठी किंवा इतरांना दुखवण्यासाठी करू नका. त्याऐवजी, त्यांचा वापर करा शेतांना सुपीक करण्यासाठी, नद्यांना स्वच्छ ठेवण्यासाठी, आणि तुमच्या प्रजेला एकत्र आणण्यासाठी!"

"क्लिओपात्रा," लिमाने क्लिओपात्राकडे पाहिलं, जी लज्जेने मान खाली घालून उभी होती "तू लिओडसच्या वशीकरणाखाली गेलीस, पण तुझ्या मनात अजूनही शुद्धता आहे. तुझ्या चुका तुला शिकवतील. आता तुझी जबाबदारी आहे की तू तुझ्या जादूचा उपयोग रोमग्रीप्टसच्या पुनर्रचनेसाठी करावास. तुझ्या वडिलांनी, थालियोसने, जंगलांना पुन्हा हिरवं करण्यासाठी आयुष्य वेचलं. तुझ्या आईने, इस्मेराल्डाने, तुझ्यासाठी आणि रोमग्रीप्टससाठी स्वतःला धोक्यात घातलं. त्यांच्याकडून शिक, आणि जादूला विधायक मार्गावर घेऊन जा."

"हा ब्लड स्टोन," लिमाने तिच्या कपाळावरील चमकणाऱ्या स्टोनकडे बोट दाखवलं—"हा शक्तीचा स्रोत आहे, पण त्याचबरोबर तो धोक्याचं प्रतीक आहे. त्याची वशीकरण शक्ती इतकी प्रचंड आहे की, ती अतिशय शुद्ध अंतःकरणालाही भ्रष्ट करू शकते. म्हणूनच मी हा स्टोन माझ्या ताब्यात ठेवला आहे. तो आता माझ्या जादुई शक्तीने शुद्ध झाला आहे, आणि तो यापुढे कुणाच्याही हातात पडणार नाही. पण हा स्टोन तुम्हाला एक धडा शिकवतो—शक्ती ही जबाबदारी आहे. ती तुम्हाला मिळाली असेल, तर तिचा उपयोग विचारपूर्वक करा. रोमग्रीप्टसच्या

जादूगारांनो, तुमच्याकडे शक्ती आहे, पण ती शक्ती तुमच्या हातात आणि मनात आहे. तुम्ही एकमेकांना साथ दिली तरच रोमग्रीप्टस पुन्हा उभं राहील!"

"झारू,"—लिमाने झारूकडे पाहिलं, जो आदराने तिच्याकडे पाहत होता—"तुझी बुद्धी आणि सामर्थ्य यांनी नेहेमीच रोमग्रीप्टसला जीवनदान दिलं आहे. थालियोसच्या पावलावर पाऊल टाकून तू सुद्धा जादुई निसर्गाचे संवर्धन करत आला आहेस. त्यांचं यापुढेसुद्धा रक्षण कर!"

"मोरोगो मोया,"—लिमाने मोरोगोकडे पाहिलं, ज्याच्या डोळ्यांत पश्चात्ताप दिसत होता—"तुझ्या चुका तुला नवीन मार्ग दाखवतील. तुझी जादू आता शुद्धतेच्या मार्गावर आण!"

आणि तुम्हा सर्वांना मी सांगते—जादू ही तुमची ओळख आहे, पण ती तुमची गुलाम नाही. ती तुमच्या हातात आहे, पण ती तुमच्या मनाला बांधील आहे. जादूचा उपयोग करा, पण तो शुद्धतेने, प्रेमाने, आणि विश्वाच्या संतुलनासाठी करा. रोमग्रीप्टसचं भविष्य तुमच्या हातात आहे, आणि मी, लिमा, तुमच्या प्रत्येक पावलावर तुमच्यासोबत आहे."

लिमाचा आवाज थांबला, आणि तिच्या पुतळ्याभोवती निळा प्रकाश पसरला, जो समुद्राच्या लाटांवर प्रतिबिंबित झाला. उपस्थित सर्व जादूगारांनी आदराने मान झुकवली. इस्मेराल्डाने क्लिओपात्राचा हात हातात घेतला, आणि थालियोसने झारूच्या खांद्यावर हात ठेवला.

मोरोगो मोया, त्याच्या लाल झग्यात, चंद्र बेटावर राहण्याचा संकल्प करत तिथेच उभा राहिला. लिमाचा पुतळा पुन्हा शांत झाला, पण तिच्या कपाळावरील ब्लड स्टोन जांभळ्या रंगात चमकत राहिला, जणू

तो रोमग्रीप्टसच्या जादूगारांना सतत स्मरण करवत होता—जादू ही शक्ती आहे, पण ती शुद्ध आणि विधायक हेतूंसाठी वापरली पाहिजे. रोमग्रीप्टसच्या जंगलात पुन्हा हिरवळ परतली. क्लिओपात्रा, इस्मेराल्डा, थालियोस, आणि झारू यांनी मिळून जादुई झाडांचं पुनर्रोपण केलं. मोरोगो मोयाला माफी मिळाली, पण त्याने स्वेच्छेने चंद्र बेटावर राहण्याचा निर्णय घेतला, जिथे तो लिमाच्या पुतळ्याखाली जादूचा अभ्यास करत राहिला!

क्लिओपात्रा, आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप करत, म्हणाली, "आई, मी तुझ्याशी युद्ध केलं, पण आता मी तुझ्यासोबत रोमग्रीप्टसचं रक्षण करेन." इस्मेराल्डाने तिच्या कपाळाचे चुंबन घेतलं आणि म्हणाली, "तू माझी मुलगी आहेस, आणि आता आपण एकत्र आहोत."

लिमाचा पुतळा, ब्लड स्टोनच्या नव्या जांभळ्या चमकेसह, चंद्र बेटावर कायम उभा राहिला, रोमग्रीप्टसचं रक्षण करत, आणि जादूच्या शुद्धतेचा संदेश देत! त्या लिमाच्या पुतळ्याच्या अनेक फूट खाली गाडलेला ब्रिजेटाचा पुतळा थोडा थोडा हलत होता. त्याच्या डोळ्यातून उकळते पाणी झिरपत होते.

ब्रिजेटाच्या पुतळ्याला मनापासून वाईट वाटत होते कारण तिचा खरा आणि सच्चा अनुयायी आणि काळ्या जादूचा उपासक लिओडस हा विस्मरण होऊन चंद्र बेटावर वेड्यासारखा भटकत होता. त्याच्यासाठी आपल्याला काय करता येईल याचा विचार ब्रिजेटाचा पुतळा करत होता.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात.

पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!
वाचायला तर हवंच!
www.esahity.com
esahity@gmail.com
9987737237
ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.

(ही कादंबरी वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया 9763793199 या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

निमिष सोनार यांचे ई साहित्य वरील साहित्य.